
म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
ग्रं क्र. २६०५

# झोपेचा गाव

शान्ता ज. शेळके




REFBK-0026082

अनुक्र
काव्य
२६०५
२६०८२
७।३।९०

२६०५
२६०८२
काव्य
७।३।९०


झोपेचा गाव



सुरेश एजन्सी



# झोपेचा गाव

शान्ता ज. शेळके

REFBK-0026082





प्रकाशक
गुलाबराव मारुतीराव कारले
सुरेश एजन्सी
२०५ शुक्रवार पेठ
पुणे ४११००२

©
शान्ता ज. शेळके


पहिली आवृत्ती
१४ जानेवारी १९९०
मकर संक्रान्त


मुखपृष्ठ
सुभाष अवचट

आतील चित्रे
चंद्रमोहन कुलकर्णी

मुद्रक
आनंद लाटकर
कॉम्प-प्रिन्ट
सदाशिव पेठ
पुणे ४११०३०


किंमत
पंचवीस रुपये






चि. रेणुका कोष्टी
ऊर्फ मन्या ऊर्फ माऊ ऊर्फ रूपाली ऊर्फ सुंदरी
हिला अत्यंत प्रेमपूर्वक

— शान्ताआत्याबाई











# अनुक्रमणिका



| | | | |
|---|---|---|---|
| झोपेचा गाव | १ | शिंगमोडका | ३३ |
| वाढ | २ | भीती | ३४ |
| एक सुंदर राजकन्या! | ३ | एक थेंब | ३५ |
| आजोळच्या वाटेवर | ४ | गिरकी | ३६ |
| एक घर | ५ | छळ | ३७ |
| तुझ्यासाठी, माझ्यासाठी | ६ | बोकोबा | ३८ |
| आली सुट्टी | ७ | कवडसा | ३९ |
| जादूचं झाड | ८ | गोड गोड गोड्डुली | ४० |
| आभाळ निळे | ९ | फुगेराव | ४१ |
| नथ | १० | आई, मला हत्ती हवा | ४२ |
| आला राग, गेला राग ! | ११ | आजोळची [illegible] | ४३ |
| मदत | १२ | माथेरानची माकडे | ४४ |
| अभ्यास | १३ | फळविक्याचे गाणे | ४५ |
| पिंटूची काठी | १४ | रास | ४६ |
| गंमत | १५ | वाघूनाना | ४७ |
| ना ! | १६ | एक छोटा रुपया | ४८ |
| पाऊस | १७ | खादाडखाऊ | ४९ |
| गुपित | १८ | बारीकराव | ५० |
| [illegible] | १९ | वेणीफणी | ५१ |
| [illegible] | २० | ताई | ५२ |
| [illegible] होईल ? | २१ | रुसवा | ५३ |
| झोका बाई झोका | २२ | झुळूक | ५४ |
| [illegible] | २३ | चोरी | ५५ |
| मोर अंगणी नाचतो | २४ | कासवआजोबा | ५६ |
| बंड्याची सर्दी | २५ | शेजारची चिमणी | ५७ |
| काळोख | २६ | नागोबा | ५८ |
| चांदोबा | २७ | अडचण | ५९ |
| मी आणि ' मी ' | २८ | श्रीमंत | ६० |
| नवे पाहुणे | २९ | आलो रे बंडू – थांब ! | ६२ |
| परकर | ३१ | वरात | ६३ |
| कलकत्त्याचे बाबू मोशाय | ३२ | ढोलकं झालं बोलकं | ६४ |






बाळूचा आजार ६५
फुगे फुगे ६६
बाबा ६७
हरवलं हसू ६८
बाई ६९
फुलपाखरे ७०
आई, समज– ७१
आम्ही रानपऱ्या ७२
एकेकाचे बाळ ७३
बाळाचे न्हाणे ७४
लाडुकला ७६
टप टप टपक ७७
चांदपरी ७९
माझे संस्कृत ८१
घोडा ८२
खंडाळ्याच्या घाटात ८३
चंद्रवीर ८४
आई मी अमिताभ आहे ८५
कधीतरी ८६
बाबा कामाला निघतात तेव्हा ८७
ते नाहीच माझे रूप ८८
साद घाली रानवारा ८९
मन्या बोक्याची डायरी ९०
एक मांजरी हिंदुस्तानी ९२
मांजरांचा गाव ९३
मनूताईंचा इराणी भात ९४
मुशाफिराचे गाणे ९५
दिवाळी ९६
आवडनिवड ९७
आई ९८
झाड लावलं झाड ! ९९
पानांचे गाणे १००
आईची झोप १०१
आला पाऊस पाहुणा १०२
देवीची सकाळ १०३
पंधराव्या मजल्यावरती १०४
तळ्याचे गाणे १०५
मायकेलमामा १०६
दिवाळीचा फराळ १०८
मुंग्यांच्या जगात ११२



## झोपेचा गाव

झोपेचा गाव आहे किती दूर ?
- जिथवर अंगाईचे पोचतात सूर !
झोपेच्या गावाची आहे कशी वाट ?
- मऊ मऊ गादीवर टेका हळू पाठ !
झोपेच्या गावी गाते कोण गाणी ?
- आजीच्या गोष्टीतली राजा आणि राणी !
कसा कधी येतो झोपेचा गाव ?
- ढगांतून चंद्र जेव्हा खेळे लपंडाव !
झोपेचा गाव केव्हा बरे गाठू ?
- डोळे जेव्हा हलकेच लागतात मिटू !
झोपेच्या गावाला जाणे किती सोपे ?
- आईला द्यावे फक्त दोन पापे !



## वाढ

वय झाले वर्ष एक
तेव्हा मी लाडकी लेक

वय झाले वर्षे दोन
तेव्हा मी नव्हतेच कोण

वय झाले वर्षे तीन
म्हटले 'हाच फ्रॉक घालीन!'

वय झाले वर्षे चार
तेव्हा गंमत वाटली फार

वय झाले वर्षे पाच
तेव्हा गाणी आणि नाच

वय झाले वर्षे सहा
बाबा ओरडले, 'चूप राहा!'

वय झाले वर्षे सात
तेव्हा होते मार खात

वय झाले वर्षे आठ
अभ्यासाने धरली पाठ

वय झाले वर्षे नऊ
तेव्हा म्हटले, 'बघून घेऊ!'

आणि हे वर्ष दहा-
आता माझा रुबाब पहा!

## एक सुंदर राजकन्या


एक सुंदर राजकन्या
नाजुक होती अशी
तिला झोपेत रुतायची
सावरीची उशी!

लिंबाएवढा भात खाई
पोळी खायची अर्धी
लवंगेने व्हायची उष्णता
वेलदोड्याने सर्दी!

एकदा वर्गामध्ये तिची
गणिते चुकली सात
तेव्हा मास्तरांनी तिला
नुसता लावला हात-

मास्तरांची चापट होती
फुलापेक्षा मऊ
तरी सुद्धा राजकन्येने
अश्रू ढाळले नऊ!

मास्तर मग स्वत: तिचे
डोळे लागले पुसू
तेव्हा राजकन्येला फुटले
चांदण्याचे हसू!



## आजोळच्या वाटेवर

आजोळच्या वाटेवर ओळखीचे झाड
अजून मला म्हणते, 'चल, चिंचा पाड।'

आजोळच्या वाटेवर दाढीवाला वड
पारंबीला धरून, म्हणतो, 'चल, वर चढ!'

आजोळच्या शेजारून वाहतो तोच ओढा
म्हणतो मला, 'छोटेराव, चला होड्या सोडा!'

आजोळच्या गोठ्यात तीच भुरी गाय
म्हणते, 'जरा शिंगाखाली खाजवशील काय?'

आजोबांच्या खलबत्त्यातले अजून रंगते पान
आजीच्या भाकरीला अजून चव छान

- उगीच सारे म्हणतात, 'बाळ झाला मोठा!'
मला तर वाटते मी अजूनही छोटा.

## एक घर

एक घर लबाड असते
खिडक्या दारे लावून बसते.

एका घराची उघडी दारें
साऱ्यांना म्हणते, 'या रे या रे!'

एक घर खादाड फार
दिवसाकाठी जेवणे चार.

एक घर हिशेब करते
मोजते पैसे, बँकेत भरते.

एक घर इतके तापट
भांडीच करतात आदळआपट.

एक घर असे भित्रे
दाराशी राखण करते कुत्रे!

## तुझ्यासाठी, माझ्यासाठी

झाडांतून पानांतून पाखरांची किलबिल
निळ्या निळ्या लाटांतून ऊन करी झिलमिल
कुणासाठी ? कुणासाठी ? तुझ्यासाठी, माझ्यासाठी !

शुभ्र पांढरे करडू हिरवळीवर नाचे
गवतात लहरते गाणे वाहत्या वाऱ्याचे
कुणासाठी ? कुणासाठी ? तुझ्यासाठी, माझ्यासाठी !

हिरवळ मऊ दाट, निळा लव्हाळ्याचा तुरा
कधी पावसाच्या धारा, कधी चमचम तारा
कुणासाठी ? कुणासाठी ? तुझ्यासाठी, माझ्यासाठी !

कधी झुळझुळ पाणी झऱ्यातून गाई छंद
जिथे बघू जावे तिथे असा आनंदी आनंद
कुणासाठी ? कुणासाठी ? तुझ्यासाठी, माझ्यासाठी !

कधी बाबा पापा घेती, कधी गोंजारते आई
कधी रांगणारे बाळ पुढे येते घाई घाई
कुणासाठी ? कुणासाठी ? तुझ्यासाठी, माझ्यासाठी !

## आली सुट्टी

आली सुट्टी आली सुट्टी आता नाही शाळा
पुस्तकांना रजा द्या अन् खूप खूप खेळा !

'ऊठ बाबा, ऊठ राजा, वाजले बघ पाच'
रोज सकाळीच आता नको आईचा काच.

उन्हे बाहेर तापली तरी घरात थंडगार
पंख्याखाली येते कशी झोप बहारदार !

थंडगार मस्त आइस्क्रीम हवे तेवढे खावे
पन्हे, लिमका, सरबत सुद्धा सारखे सारखे प्यावे.

काळी काळी जांभळे, लाल कलिंगडाची खाप
गोड गर जिभेवरती विरतो आपोआप.

संध्याकाळी सारसबागेत चटकमटक भेळ
दोस्तांसंगे भटकंतीला पुरत नाही वेळ !

अशी सुट्टी बघता बघता संपून जाते कशी ?
वह्यापुस्तके घेऊन शाळा फिरून येते कशी ?



## जादूचं झाड

अंगणात रुजलं जादूचं झाड
भर भर झाली त्याची वाढ

झाडाला पानं फुटली सात
उडून गेली आभाळात!

पानं लागली वरती उडू
झाड झालं रडू रडू!

उदासवाणं झालं झाड
पानांवाचुन सर्व उजाड
पानं बोलली, 'परतुन जाऊ
झाडावरती बसून राहू!'

झाडाच्या भक्कम खांद्यावर
पानं बसली फांद्यांवर

पानांचे झाले पोपट सात
मजेत बसले गाणी गात!

## आभाळ निळे

आभाळ निळे लख्ख मोकळे
खालती तळे त्यात कमळे.

निळी लव्हाळी गर्द दाटती
फुलपाखरे तिथे भेटती.

लव्हाळ्यावर जांभळे तुरे
वर चतुर मजेत फिरे.

कुरणातून कोकरू उडे
घार आभाळी सरळ चढे.


संथ पाण्यात पान पडते
भिते पाखरू, भुर्र उडते!

आंबराईत सावली गार
जागा मला ती आवडे फार.

## नथ

चिमणा बाहेर कामाला गेला
त्याला सापडला एक मोती
चिमणी घरी सैपाक करून
त्याची वाट बघत होती.

टपोरा सुंदर मोती बघून
चिमणी चिमण्याला म्हणते कशी ?
'याची छानशी नथ करीन
नाकात घालीन... अशी... अशी...!'



बापडा चिमणा करतो काय ?
सोनाराचे गाठले दुकान
तारेमध्ये मोती गुंफून
नथ करून आणली छान.

चिमणीची चोच इवली इवली
तिला नथ पेलणार कशी ?
नथ घालून आपले रूप
चिमणी आरशात बघणार कशी ?

खटपट करून चिमणी दमली
मग गुपचुप राहिली बसून
'नाकापेक्षा मोती जड !'
चिमणा बोलला चावट हसून !

# आला राग गेला राग!

आला राग गेला राग
चिकि मिकि च्याऊ
हास पोरी हास!
आपण छान गाणं गाऊ!

नाक झालं लालम् लाल
टपोर फुगले दोन्ही गाल
घट्ट मिटले ओठ उघड
काही बोल पाहू!

हळूच बघतो तिरपा डोळा
लबाड मोठा, नाही भोळा
फुटेल हासू खुदकन
लपवून नको ठेवू!

रुसून बसली अश्शी अश्शी
आत्ता कश्शी, आत्ता कश्शी!
हळूच हसले डोळे म्हणती
'एक पापा देऊ?'

## मदत

बाबा आणि आई, दादा आणि ताई
कुणालाच काही कळत कसं नाही ?
मीच रात्री यांची कामं टाकते करून
म्हणून यांचा दिवस मजेत जातो सरून !

बाबांच्या टेबलावर कामाचे भार
मीच त्यांचे कागद लिहून ठेवते सारे.
सकाळी फाइल तयार असते छान
बाबा जातात ऑफिसात ताठ ठेवून मान !

मिर्ची नि कोथिंबीर, फ्रिजमधली भाजी
मीच ठेवते निवडून शिळी आणि ताजी.
सकाळी मग जेव्हा कामाला लागते आई
सैपाकाची तिला होत नाही घाई !

ताईचा गृहपाठ मीच लिहून ठेवते,
दादाच्या शर्टाची बटणं मीच लावते,
त्यांना मात्र वाटतं आपणच हुषार
ऊठसूठ खेळायला दोघं होतात पसार !

कधीतरी माझ्या तोंडात येतं बाई-
'माझ्यामुळं साऱ्यांची चैन आहे नाही ?'
आई म्हणते, 'वेडे, तुला स्वप्न पडलं बरं !
कसं तिला कळत नाही ? काय खोटं खरं ?

## अभ्यास

बबड्या गेला रानात पुस्तक लागला वाचू
इवली पांढरी करडे भवती लागली नाचू!

बबड्या गेला बागेत, घोकू लागला पाढा
फुले बोलली हसून, ‘बघा बघा वेडा!’

बबड्या गेला नदीकाठी गणिते लागला सोडवू
खोडकर वारा त्याच्या वह्या लागला उडवू.

रागावून बबड्या गणित लागला पुसू
झाडावरच्या साळुंकीला खुदकन आले हसू!

सन आणि शक बबड्या करू लागला पाठ
तर एका पाखरानेच अडवली त्याची वाट.

बबड्या बिचारा भ्याला, धावत आला घरी
खांद्यावरून त्याच्या आली एक परी!

गुणगुण गुणगुणणारा संगे आला भुंगा
बबड्याचा अभ्यास कसा व्हायचा सांगा?



## पिंटूची काठी

आमच्या पिंटूची आहे एक काठी
अगदी त्याची अन् त्याच्याचसाठी .

कधी पिंटू करतो काठीचा घोडा
म्हणतो, ‘बाजू हटो, चला, वाट सोडा !’

कधी पिंटू धावतो काठीची बंदूक करून
गोळी झाडतो तेव्हा आम्ही पडतो मरून !

पिंटूची काठी कधी बनते तलवार
दिसेल त्याच्यावर सप सप करतो वार.

काठीचा कधी होतो सळसळता साप
आम्ही म्हणतो, ‘साप ? अरे बापरे बाप !’

कधी काठीचे निशाण पिंटू उंच धरतो
आम्ही सारे तेव्हा झेंडावंदन करतो !

कधी मात्र पिंटूची काठी असते काठी
मनात येईल त्याच्या खुशाल घालतो पाठी !

## गंमत

आज डोंगरावरून उतरुन खाली ये आभाळ
नदी घेउनी खांद्यावरती धावत सुटला माळ !

खद् खद् हसल्या फांद्या, भरभर उडून गेली पाने
झाड डोलले मजेत, आणिक गाउ लागले गाणे.

फुलांफुलांतून पऱ्या उमलल्या, कळ्यांकळ्यांतुन भुंगे
हिरवळ उठली, नाचत सुटली, सशास फुटली शिंगे !

गेंड्यावरुनी निघे फिराया चांदोबाची स्वारी
पाच चांदण्या संगे होत्या, ऐट तयांची भारी.

जीव घेउनी मांजर पळता उंदिर मागे धावे
सिंह आणखी वाघ आपुली विसरून गेले नावे.

आठवता ते अजून सारे गंमत मजला वाटे
खरेच झाले असेच सारे : खरे म्हणा की खोटे !

## ना ?

झाडाशी झाड पानाशी पान
गवताशी गवत बोलते ना ?
गालाला गाल भिडला तर
फूल फूल खुषीत डोलते ना ?

सुळ सुळ सुळुक वाऱ्याची झुळूक
शेताला गुदगुल्या करते ना ?
लाटांवर लाटा अंगावर काटा
कणसांत आनंद भरते ना ?

कोवळी उन्हे- बाळ जसे तान्हे-
हळूच पायरी चढतात ना ?
चांदण्याच्या टिकल्या काठाशी झुकल्या
डुबकन पाण्यात बुडतात ना ?

काळ्या नि सावळ्या झाडांच्या सावल्या
मऊगार हिरवळ होतात ना ?
तापलेल्या माळात झळ झळ झळांत
तळव्यांना थंडावा देतात ना ?

चिमुकली पाखरे पाखफुटी लेकरें
घरट्यात सुखाने जगतात ना ?
आभाळ निळे जसे आजोबांचे डोळे
आम्हाला मायेने बघतात ना ?

भोवताल सारे, चंद्र, सूर्य, तारे,
प्रेमाचा डाव असा मांडतात ना ?
खरं सांग आई, मला कळतच नाही
माणसेच वेडी भांडतात ना ?

# पाऊस

पाऊस पडतो सर सर सर
घरी चला रे भर भर भर !

पाऊस पडतो पट पट पट
पाउल उचला रे झटपट.

पाऊस आला सड सड सड
छातीत होते धड धड धड !

पाऊस पडतो मुसळधार
भिती वाटते मजला फार.

पाऊस वाजे धडाड धूम
धावा, धावा, ठोका धूम !

धावता धावता गाठले घर
पड रे पावसा दिवसभर !

पड रे पावसा चिडून चिडून
आईच्या कुशीत बसलो दडून !

## गुपित

चिमूताई चिमूताई काय करता ?
अलिकडे घरभर काय फिरता ?

टुणु टुणु टुणु टुणु नाचता का ?
काडी कापूस वेचता का ?

आईचा गुंतवळ नेता कधी
दोरा लोंबतो चोचीमधी !

कधी कधी काळजीत दिसता का ?
नुसत्याच गुपचूप बसता का ?

इवलंसं पोट झालंय जड
म्हणून चालली ना धडपड ?

नवीन घरटं होणार ना ?
त्यात पिलं येणार ना ?

आरशाच्या मागं, कपाटावर,
खुशाल करा सुरेख घर

कळलं तुमचं गुपित खास
नाही देणार तुम्हाला त्रास !

## दात

वय होते वर्षे सात
तेव्हा मुलांचा पडतो दात.

दात बागेत पुरला तर
फुले येतात हाराभर !

दात फेकला कौलांवर
तर सोन्याचे होते घर.

दात ठेवला कपाटात
तर पैसे दुप्पट होतात.

दात लपवला दाराआड
तर बाबा करतात लाड.

दात शाळेमागे टाका
गणितात होत नाहीत चुका.

दात ठेवा उशीखाली
गादी होणार नाही ओली !




## बाग

मी मोठा झाल्यावरती एक सुंदर बाग करीन
मीच खणून काढीन वाफे, आळ्यात मीच पाणी भरीन.
गंमत म्हणून बागेमध्ये माळीबुवा असतील एक
प्रेमळ डोळे, हसरे ओठ, दाढीमिशा पांढऱ्याफेक!

उंच झाडे, वळत्या वेली, गवत असेल हिरवेगार
पाटांमधून चमकत वाहील झुळझुळ पाणी निळेशार!
बाग माझी गोजिरवाणी साऱ्यांसाठी खुली असेल
फाटकापाशी भो भो भुंकत चावरा कुत्रा उभा नसेल.

'फुले तोडण्यास सक्त मनाई' बागेत माझ्या असणार नाही
'झाडांना हात लावू नका' पाटी कुठे दिसणार नाही.
बागेत माझ्या हवे त्याने सांजसकाळ खुशाल यावे
खेळावेत खेळ आणि आवडेल ते ते फूल घ्यावे.

रंगीत फुले खुडण्यासाठी मुलांची एकच उडेल घाई,
झाडांखाली गप्पा मारतील आजोबा नि आजीबाई,
मोठा झाल्यावरती खरेच अशीच मी करीन बाग
डवरून येतील फुले, मुले, ताटवे हसतील जागोजाग!



## तर काय होईल ?

फुलाला जर कळी आली
कळीला जर पान आलं
पानाला जर फांदी आली
फांदीला जर झाड आलं
        तर काय होईल ?

थेंबाचा जर पाऊस झाला
पावसाची जर वाफ झाली
वाफेचा जर ढग झाला
ढगाचं जर आभाळ झालं
        तर काय होईल ?

## झोका बाई झोका

झोका बाई झोका
लिंबाची फांदी
बाळाला झोक्यावर
बसवा ग आधी.

झोका बाई झोका
रेशमाची दोरी
बाळाला झोका
देतात पोरी.

झोका बाई झोका
झोक्यावर बसू
बाळाला आलं
खुदकन हसू!

झोका बाई झोका
लांबून येतो,
बाळाला उंच उंच
घेऊन जातो.

झोका बाई झोका
येतो कसा खाली
घाबरलं बाळ
भोवळ आली!

## वारं

झुळकेसरशी वारं येतं
केसांच्या बटा उडवून जातं!

पावसात भिजून वारं आलं
गारेगार करून गेलं!

गुलाबी अत्तर वाऱ्यानं लावलं
खुषीत येऊन घरभर धावलं.

वाऱ्यानं धरला गोल गोल फेर
घरात झाला केरच केर!

वाऱ्याची गिरकी वर वर गेली
वाळलेली पानं उडवून नेली!

वाऱ्याच्या अशा हजार खोड्या
काही शहाण्या, काही वेड्या.

वारं माझ्याशी करतं मस्ती
त्याची माझी जिवाची दोस्ती.

मला एकदा रडू आलं
वारं डोळे पुसून गेलं!

# मोर अंगणी नाचतो

मोर अंगणी नाचतो
मोर छुम छुम छुम नाचतो !


ढग आभाळी दाटती
धारा पाण्याच्या फुटती
थेंब चोचीने वेचतो
मोर अंगणी नाचतो !

मोर पिसारा उघडी
संगे नाचती सौंगडी
भुई अलगद टोचतो
मोर अंगणी नाचतो !

मोरपिसारा थरथरे
पाचू, इंद्रनीळ, हिरे,
तुरा रत्नांनी खचतो
मोर अंगणी नाचतो !

मोर वेळावतो मान
निळी सोनेरी कमान
चोच पिसांत खोचतो
मोर अंगणी नाचतो !

मोर बोलावतो ढगा
लाभ पावसाचा जगा
दारी सागर साचतो
मोर अंगणी नाचतो !



२६०५
२६६८
२२।३।७०

## बंड्याची सर्दी

चिंचा पेरू खाल्ले, वर पाणी प्याला
आणि बंड्या सर्दीने बेजार झाला!

खोकायला लागला ठसा ठसा ठसा
दुखू लागले डोके, दुखू लागला घसा.

बंड्याला आल्या सटा सटा शिंका
आईला आली न्यूमोनियाची शंका

बंड्याला आला एकशेएक ताप
घाबरून गेला भारी बंड्याचा बाप!

बंड्याला बघायला डॉक्टर घरी आले
बंड्याच्या सर्दीला ते सुद्धा भ्याले.

इंजेक्शन दिले त्यांनी, औषध पाजले कडू
बंड्याच्या आईला आवरेना रडू!

रात्रभर आई बिछान्याशी जागली
कधी तरी पहाटे तिला झोप लागली.

सकाळीच बंड्या झोपेतून उठला
कुठली त्याला सर्दी? ताप तरी कुठला?

'हाय रे पठ्ठे!' बोलला, बंड्याला फुटले हसू
चिंचा, पेरू डोळ्यांसमोर पुन्हा लागले दिसू!

# काळोख

आई जरा जवळ घे
मला वाटते भिती
अबब ! अबब !
काळोख काळा किती ?

काळोखात खिडक्या
डोळे घेतात मिटून
घराच्या भिंती सुद्धा
कुठे जातात उठून ?

कसले कसले आवाज
मला ऐकू येतात,
कुणाची पावले
माझ्याजवळून जातात ?

आई आई आधी
एक मला सांग,
काळोखात बागुलबुवा
खरंच असतो का ग ?

आई फक्त अंगावर
टाक तुझा हात-
मग मुळीच नाही मी
भिणार काळोखात !

# चांदोबा

चांदोबा फुलांचा, चांदोबा मुलांचा
चांदोबा चमचमत्या पाण्याचा
चांदोबा जाईचा, चांदोबा जुईचा
चांदोबा आईच्या गाण्याचा!

लिंबोणीमागून दमून भागून
आभाळी चढतो हळूहळू
ढगांत तुटतो, लाटांत फुटतो
चांदोबा रडतो मुळू मुळू!

पानांच्या जाळीत फांद्यांना टाळीत
चांदोबा पळतो तुरू तुरू
दुधात न्हाऊन चांदणे होऊन
अंगणी गळतो भुरू भुरू!

शर्यत लावून जोराने धावून
संगे मला घेऊन जातो कुठे?
खिडकीआडून बघतो दडून
पहाटे उडून जातो कुठे?

दुधाच्या वाटीत तुपाच्या रोटीत
चांदोबा वाटा मी देइन तुला
आईच्या भावाच्या मामाच्या गावाच्या
आजोळी घेऊन जा रे मला!

## मी आणि ‘ मी ’

माझ्याबरोबर दुसरा एक ‘ मी ’
असतो, हिंडतो, फिरतो नेहमी.

मी तेवढा एकटा सगळ्यांना दिसतो
‘ मी ’ मात्र माझ्यात लपून असतो.

माझी नि ‘ मी ’ची येवढी मैत्री
आम्ही दोघे एकत्र दिवसारात्री.

मला जेव्हा गणित सुटत नाही
‘ मी ’ ते पटकन सोडवून देई.

कामे करताना मी जेव्हा थकतो
‘ मी ’ माझी कामे उरकून टाकतो.

धावताना कधी मी धाडकन पडतो.
गुडघे चोळत ‘ मी ’ तेव्हा रडतो!

मला जेव्हा मिळतो गोड गोड खाऊ
‘ मी ’ला टाकून मी एकटा कसा खाऊ ?

## नवे पाहुणे

नवे पाहुणे घरी कोण हे आले?
नावही त्यांचे मला माहिती नाही
बाबांनी पण मिठी मारली त्यांना
लगबग आली हासत आतुन आई.

नवे पाहुणे रुबाब त्यांचा न्यारा
अंगावरती निळा लोकरी सूट
कुरळे कुरळे विस्कटलेले केस
पायांमध्ये चमचमणारे बूट.


मला पाहुनी हसले आणि म्हणाले,
'ती तेव्हाची इवली चिमणी का ही?
किती छान अन् सुंदर दिसते आता!'
ऐकुन मी तर लाजुन गेले बाई.

जवळ घेउनी मला पकडले त्यांनी
उचलुन घेउन हळुच घेतला पापा,
'ओळखले का? खुळे, तुझा मी काका'
म्हणता ते मी म्हटले, 'थापा, थापा!'

बाबा हसले आणिक हसली आई
आणि मलाही खोल आठवे काही,
खरेच की, हा काका, बंडाकाका!
किती वेगळा, सुरेख दिसतो नाही?

फॉरिनला की म्हणे कुठेसा होता
किती बाहुल्या मला धाडल्या त्याने
चॉकलेट अन् किती पुस्तके, चित्रे,
रबरी मांजर पिवळे, गोजिरवाणे!

ओरडले मी, 'काका, बंडाकाका!'
मिठी मारली त्यांना, रडले थोडी,
गाल पकडुनी माझा हसले बाबा,
कुरवाळुन मज आई म्हणाली, 'वेडी'



## परकर

सुईत दोरा ओवला ग
मावशीनं परकर शिवला ग.


परकर माझा हिरवागार
झगमग करते रुंद किनार.

जरीचे ठिपके चमचमती
चांदीची घुंगरं रुमझुमती.


मी बाई परकर नेसते ग
जपून जपून बसते ग !

हातांत परकर धरते ग
मी बाई गरगर फिरते ग !

परकर झाला गोल फुगा
गोरे माझे पाय बघा !



# कलकत्त्याचे बाबू मोशाय



कलकत्त्याचे बाबू मोशाय
बोलतात कसे? खातात काय?
पोकळ धोतर लांबलचक झब्बा
हातात सदा पानाचा डबा!

'आशून', 'बोशून', 'भालोबाशी'
भाषा त्यांची मऊ मऊ अशी.

'आमार' 'तोमार' त्यांचे बोल
एकेक शब्द गोल गोल गोल!


शोंदेश चमचम रोशोगुल्ला खातात
रोबींद्र शोंगीत मोशाय गातात!

मोशायचा देश म्हणे फार चांगला
नाव त्याचे आहे शोनार बांगला!

## शिंगमोडका

शिंगमोडका बैल बिचारा
मानेवरती जोखड घेतो
चाबुक खातो पाठीवरती
निमूट ओझे ओढुन नेतो.

शिंगमोडक्या बैलासंगे
कुणीच नाही करीत दोस्ती
दिवसा शेतावरी राबतो
गोठ्यामध्ये रात्री वस्ती!



धडकी शिंगे, रुबाब न्यारा
'पवळ्या' त्यावर डुरकत राही
शिंगमोडका थरथर कापे
खोंड खिदळती, हसती गाई!

शिंगमोडका कडबा चघळी
ओला चारा इतरांसाठी
सारे खाउन उरल्या सुरल्या
आंबोणाची त्याला पाटी.

शिंगमोडका स्वप्नामध्ये
ढवळा नंदी होय भयंकर
पाठीवरती वाहुन नेतो
देव थोरला भोळा शंकर!

# भीती

परवा एका हत्तीशी केली बातचीत
तेव्हापासून नाक वाढले दीड वीत !

एका चित्त्याबरोबर नुसता घेतला चहा
अंगावरती माझ्या ठिपके उठले दहा !

आईकडे बसायला आल्या मुंगीबाई
तेव्हापासून साखरेशिवाय जेवण जात नाही !

एका जिराफाने मला दुरून 'हॅलो' केले-
मान झाली लांब, डोके आभाळात गेले !

कालच मला खेटून गेली एक गाय
भीती वाटते, आता शिंगे फुटणार की काय ?

## एक थेंब

एक थेंब आभाळातुन खाली आला
एक पान पाठीवरती झेली त्याला.

पानावरच्या थेंबाचे मग झाले मोती
एक परी असे मोती वेचत होती.

परीने केली त्या मोत्यांची सुंदर माळ
गळ्यात घालुन परी हिंडली रानोमाळ!

ऊन पडता मोती सारे गेले विरून
परी गळा चाचपते आहे फिरून फिरून.

'पुन्हा कधी पावसामध्ये जाईन भिजून?
घालीन माळ'- वाट बघते परी अजून!

# गिरकी





वेष रेशमी लेवू या
गरगर गिरकी घेऊ या!

आम्ही मुली साजऱ्या
नाही मुळी लाजऱ्या
गोल भिंगऱ्या होऊ या
गर गर गिरकी घेऊ या!



शुभ्र पांढऱ्या वेषात
भुर भुर उडत्या केसांत
फिरते वारे ओवू या
गर गर गिरकी घेऊ या!



गिरकी अमुची येता वेगा
झाडे होतिल हिरव्या रेघा
उंच आभाळी जाऊ या
गर गर गिरकी घेऊ या!



गर गर गिरकी येइल रंगा
पंखच फुटतिल अवघ्या अंगा
आनंदाने न्हाऊ या
गर गर गिरकी घेऊ या!

## छळ

ताई मारते टप्पल
दादा काढतो खोडी
मामा वेणी ओढून
मला भंडावून सोडी!

आजोबांचे आपले
भलतेच असते काही
असे प्रश्न विचारतात
उत्तर आठवत नाही.

काका आल्याबरोबर
त्यांना हवे पाणी
मावशी सारखी ऐकवते
सिनेमातली गाणी.

आत्याबाई लठ्ठ
धापा टाकत येतात,
'पंखा, पंखा, पंखा'
ओरडून त्रास देतात.

अस्सा एकेकाचा
तऱ्हेवाईक स्वभाव
आई आहे म्हणून
माझा लागतो निभाव!

## बोकोबा

बोकोबांच्या भेटीला गणपतिबाप्पा आले
बोकोबा गर्वानि तट्ट फुगून गेले!

गणपतिबाप्पा बोकोबाला म्हणतात काय,
'बोकोबा, तुमचे कसे मखमली पाय!

बोकोबा, तुमचा आहे वाघामारखा रंग
चट्टेरी पट्टेरी रेशमाचे अंग!

बोकोबा, तुमच्या डोळ्यांमध्ये वीज
काळोखात शिकार करता रात्री नाही नीज!'

गणपतीचे बोलणे ऐकून बोकोबा झाले ताठ
हसू लागले मिशीमध्ये उंच करून पाठ.

गणपतिबाप्पा बोलले मग आवाज करून मऊ,
'एकच ऐका बुवा! आमचा उंदीर नका नेऊ!'

## कवडसा

सूर्याचा कवडसा थेट वरून आला
फुलांच्या पाकळ्या दिपवून गेला!

पानांवरून जरासा सरकला पुढे
चमकून पाहिले एका कळीकडे.

फुलपाखरांच्या पंखांवरचे रंग
वेचण्यात झाला कवडसा दंग.

मग लुब्बा आला खिडकीवाटे आत
पाळण्यातल्या बाळाचे मुके घेतले सात!

मिचकावले डोळे ताईला बघून
कवडसा पुन्हा बाहेर गेला निघून.

खिडकीच्या कडेवर घसरला नि फुटला
- तरी बेटा पुन्हा हसत हसत उठला!

सूर्य म्हणाला कवडशाला, 'आता पुरे खेळ!
परत घरी जायची झाली नाही का वेळ?'

## गोड गोड गोडुली

गोड गोड गोडुली
लाडाची लाडुली !

ताई गोरी पान
जसे केवड्याचे पान

ताईचे डोळे
जसे कमळाचे तळे !

मऊ हात पाय
जशी दुधावरची साय

पायांमध्ये तोडे
तिच्या पाठीवर गोंडे

ताईची चोळी
वर मोत्यांची जाळी

ताईची साडी
वर चांदण्याची खडी

ताईचे हसू
त्याचे मोल नका पुसू !

## फुगेराव

जरासा गोल, जरासा लांबडा
एक होता फुगा तांबडा तांबडा.

फुग्याने धरला भलताच हट्ट
म्हणाला, 'फुगेन, होईन लठ्ठ!'

फुगा लागला भर भर फुगू
मुले लागली नवलाने बघू.


फुगा फुगला भर भर भर
आणि उडाला वर वर वर.

फुग्याला वाटली भलतीच मजा
म्हणाला, 'मी तर फुग्यांचा राजा!'


फुग्याने सूर्याला मागे टाकले
पण त्याला एका ढगाने झाकले.

फुगा गेला ढगाच्या आड
आवाज झाला 'फट्ट फाड!'

कळलेच नाही नक्की काय झाले?
फुगेराव पुन्हा खाली नाही आले!



# आई, मला हत्ती हवा!



आई ग! आई मला हत्ती हवा!
विमान मोटर नको नको ग उंटांचा कारवा
आई ग! आई मला हत्ती हवा!

आई आपण हत्ती पाळू
प्रचंड तरिही किति मायाळू
त्याच्यासंगे आपण खेळू खेळ मजेचा नवा
आई ग! आई मला हत्ती हवा!

कान फताडे इवले डोळे
ध्यान कसे हे दिसते भोळे!
काळा याचा रंग ढगाचा जशी वादळी हवा
आई ग! आई मला हत्ती हवा!

नारळ, केळी चारू त्याला
केशरि पेढा सणासुदीला
सोंड उभारून हसेल हत्ती, म्हणेल जणु 'वाहवा!'
आई ग! आई मला हत्ती हवा!

## आजोळची वाट

वाट आजोळाची सोपी
मामाचा वाडा चौसोपी.

वाड्याचं जोतं चिरेबंदी
समोर अंगण काचबंदी

अंगणात फुलल्या जुईजाई
गोठ्यात हंबरती गायी.

खिलार जोडी बैलांची
मामाची गाडी डौलाची!

मामा माझा गुलहौशी
दौडत गाडी आणी कशी!

मामी गोऱ्या रंगाची
चोळी हिरवी भिंगाची,

पदर घेते डोईवरून
मामी हसते गाल भरून.

दूध शेवया ताट भरी
वरी तुपाची धार धरी.

गुळमाऱ्यांच्या गोडीचं
आजोळ माझ्या आोढीचं.

निघता होते तोंड कडू
डोळे होती रडू रडू.



# माथेरानची माकडे

माथेरानची माकडे
आहेत अशी हुषार
त्यांना बघून वाघ सुद्धा
घाबरून होतात पसार.



माथेरानची माकडे मारतात
फांदीवरून उड्या
नाक खाजवून काढतात
लहान मुलांच्या खोड्या.

माथेरानची माकडे
आहेत अशी धीट
कड्यावरून कड्यावर
झेप घेतात नीट!

माथेरानची माकडे खातात
चिक्की आणि टॉफी,
फराळ करून पितात वर
गरम गरम कॉफी.

माथेरानची माकडे अशी
छान 'पोज' देतात,
वर्तमानपत्रात त्यांचे
फोटो छापून येतात!



## फळविक्याचे गाणे

हव्यात का कुणाला फळांच्या फोडी ?
फळे खाऊन वाढवा उंची अन् जाडी.

रसरशीत गोल सफरचंदाचे काप
लाल लाल भडक कलिंगडाची खाप.

अलगद सोलून करा बरं मोकळ्या.
संत्र्याच्या टपोर रसदार पाकळ्या.

बिनबियांची द्राक्षे तर ओठांनी खायची
जिभेलाच सारी गोडी कळून यायची.

केळ्याचे मऊ मऊ लुसलुशीत अंग
पपयीचा खुलतो गहिरा केशरी रंग.

आणि आंबा ? तो तर फळांचा राजा
रत्नागिरी हापूसचा केवढा गाजावाजा !

मधून मधून चाखा पिकलेले चिकू
फन्ना उडवा काही मागे नका टाकू.

फळे खातो तोच होतो तगडा पहिलवान
फळे खाऊनच झाला बळी हनुमान !


## रास

पायांत पैंजण छुमछुमती
सोन्याची घुंगरं रुमझुमती
हातांत काकणं किणकिणती
मनातलं गाणं गुणगुणती
गोल गोल साऱ्या फिरा ग
रास आला भरा ग!

पुनवचांदणं झळझळतं
यमुनेचं पाणी झुळझुळतं
लाटांत चांदणं विरघळतं
पानांत चांदणं सळसळतं
ओंजळीत ते धरा ग
रास आला भरा ग!

नंदबाळ हा आनंदी
गोपसखे भवती फंदी
घुमवि बासरी स्वच्छंदी
खेळाला चढली धुंदी
विसरा आता घरा ग
रास आला भरा ग!

श्रीकृष्णाच्या संगात
लय भरलीसे अंगात
कदंब आले रंगात
मन मुरले श्रीरंगात
रंगसोहळा करा ग
रास आला भरा ग!



## वाघूनाना

वाघूनाना वाघूनाना काय तुमचा रुबाब
जसे काही शोभता तुम्ही जंगलातले नबाब !

काळ्यापिवळ्या पट्ट्यांचा मखमली कोट
कोटाखाली लपलप करते तुमचे पातळ पोट.


गोल डोळे धगधगणारे निखारेच दोन
डोळ्यांना त्या डोळा, बाप रे ! भिडवणार कोण ?

शेपटीचा गोंडा त्याची सावध चपळ ऐट
झेप तुमची सावजावर जाऊन पडते थेट.

डरकाळी फोडता तुम्ही ताठ उभारून कान
तेव्हा भिऊन थरथरा कापते सारे रान !

वाघूनाना वाघूनाना, याल आमच्या घरी ?
पण तुमचे विक्राळ रूप ? अडचण आहे खरी.

नाही तर होऊन या मांजर गोजिरवाणी
मग मात्र तुम्हाला भिणार नाही कुणी !



## एक छोटा रुपया

एक छोटा रुपया हॉटेलात गेला
कपभर चहा हवा होता त्याला,
हॉटेलवाला बोलला, 'देऊ कसा चहा ?
दोन रुपये कप : भाव वाचून पहा!'

एक छोटा रुपया मंडईत गेला
भाजीसाठी मिरच्या हव्या होत्या त्याला,
भाजीवाली बोलली, 'देऊ कुठून मिरच्या ?
तुला काय वाटलं आहेत तुझ्या घरच्या ! '

एक छोटा रुपया गेला वाण्याकडे
धान्यासाठी त्याने पिशवी केली पुढे;
'डाळदाणे पाच, तांदुळदाणे सहा,
वाणी बोलला, 'येवढं धान्य पुरेल का पहा!'

एक छोटा रुपया सिनेमाला गेला
'तुफान मेल' सिनेमा बघायचा होता त्याला;
तिकीटमास्तर बोलला, 'देऊ कसे तिकीट ?
तुझे तर फारच बुवा छोटे आहे पाकीट!'

एक छोटा रुपया हिरमुसला असा
धावत येऊन पुन्हा त्याने गाठला आपला खिसा!

## खादाडखाऊ

बंब्या होता गोलम् गोल
हातपाय भोपळे, पोटाचा ढोल.
रसगुल्ल्यासारखे फुगरे गाल
हसताना व्हायचे बंब्याचे हाल!

बंब्या होता खादाड फार
दिवसातून जेवणे लागायची चार.
सकाळी न्याहारी, दुपारी खाणे,
तरी 'भूक लागली' सदा हेच गाणे!

तेही बंब्याला पुरायचे काय?
चोरून खायचा दुधावरची साय.
शेंगदाणे खोबऱ्याने तुडुंबले खिसे
बंब्या भरायचा मूठ आणि पसे!

भरल्या तोंडाने बोलत राही
काय बोलतो तेही कळायचे नाही.
चिंचा, बोरे, आवळे, पेरू-
हाही खुराक सारखा सुरू!

बंब्या असला खादाडखाऊ-
आई म्हणते, 'हा बकासुराचा भाऊ!'

## एक छोटा रुपया

एक छोटा रुपया हॉटेलात गेला
कपभर चहा हवा होता त्याला,
हॉटेलवाला बोलला, ‘ देऊ कसा चहा ?
दोन रुपये कप : भाव वाचून पहा ! ’

एक छोटा रुपया मंडईत गेला
भाजीसाठी मिरच्या हव्या होत्या त्याला,
भाजीवाली बोलली, ‘ देऊ कुठून मिरच्या ?
तुला काय वाटलं आहेत तुझ्या घरच्या ? ’

एक छोटा रुपया गेला वाण्याकडे
धान्यासाठी त्याने पिशवी केली पुढे;
‘ डाळदाणे पाच, तांदुळदाणे सहा,
वाणी बोलला, ‘ येवढं धान्य पुरेल का पहा ! ’

एक छोटा रुपया सिनेमाला गेला
‘ तुफान मेल ’ सिनेमा बघायचा होता त्याला;
तिकीटमास्तर बोलला, ‘ देऊ कसे तिकीट ?
तुझे तर फारच बुवा छोटे आहे पाकीट ! ’

एक छोटा रुपया हिरमुसला असा
धावत येऊन पुन्हा त्याने गाठला आपला खिसा !

## खादाडखाऊ

बंब्या होता गोलम् गोल
हातपाय भोपळे, पोटाचा ढोल.
रसगुल्ल्यासारखे फुगरे गाल
हसताना व्हायचे बंब्याचे हाल!

बंब्या होता खादाड फार
दिवसातून जेवणे लागायची चार.
सकाळी न्याहारी, दुपारी खाणे,
तरी 'भूक लागली' सदा हेच गाणे!

तेही बंब्याला पुरायचे काय?
चोरून खायचा दुधावरची साय.
शेंगदाणे खोबऱ्याने तुडुंबले खिसे
बंब्या भरायचा मूठ आणि पसे!


भरल्या तोंडाने बोलत राही
काय बोलतो तेही कळायचे नाही.
चिंचा, बोरे, आवळे, पेरू-
हाही खुराक सारखा सुरू!

बंब्या असला खादाडखाऊ-
आई म्हणते, 'हा बकासुराचा भाऊ!'

## बारीकराव

बारीकराव बारीकराव
इतके तुम्ही बारीक दिसता
तरी देखील बघावे तेव्हा
तुम्ही आपले मजेत असता.

बारीकराव बारीकराव
पडवळासारखे तुमचे दंड
गलेलठ्ठ पहिलवान
तुम्हाला बघून पडतात थंड!



बारीकराव बारीकराव
टिचभर जरी तुमची छाती
गल्लीमधले गुंड सारे
तुम्हाला बघताच पळून जाती!

बारीकराव बारीकराव
काटकीसारखे तुमचे पाय
मैल मैल धावता तरी-
तुमच्या शक्तीचे रहस्य काय?

बारीकराव बारीकराव
दिसता तुम्ही असे खप्पड
भल्याभल्यांना चक्कर येते
अशी तुमची जबर थप्पड!



## वेणीफणी

ही बघ बसते आरशापुढे
माझी वेणी घालून दे गडे!

उद्या न्हाइन म्हणता म्हणता
केसांचा किती झालाय गुंता?

आई, आधी मला हे सांग
सरळ की वाकडा पाडशील भांग?

केस माझे सुंदर, लांब-
अग, किती ओढतेस? थांब!

अयाई मानेला लागली रग
पुन्हा केस ओढलेस, बघ.

लावू नको ग इतकं तेल
माझं तोंड जांभळं दिसेल!

नाही तर आई असंच कर
केस मानेशी जुळवून धर.

सैल बांध, लागेल ओढ
नुसताच मागे झुपका सोड,

बघ गेला सबंध तास
वेणी म्हणजे त्रास, त्रास!

# ताई

आई या ताईला झालंय तरी काय ?
जमिनीवर ठरतच नाही हिचा पाय.

दिवसातून दहा वेळा बदलते साडी
दाराशी खडी भली थोरली गाडी.

गाडीतून ताई गावभर फिरते
नवऱ्याच्या जिवावर रुबाब करते.

आम्हाला दाखवते सासरचा धाक
आमच्या घराला मुरडते नाक !

झाली असेल मोठी राजाची राणी
आम्ही काय तिच्यापुढे नाहीच का कुणी ?

हिऱ्याच्या कुड्या, मोत्यांचा कंठा
ताईला भरलाय भलताच ताठा.

आई ग, मी सुद्धा बघीन बघीन
ताईसारखं जुळवीन माझंही लगीन !

## रुसवा

चिमणीचं बाळ आईवर रुसलं
घरट्याबाहेर जाऊन बसलं.

चिमणीनं आणला कोवळा पाला
बाळ म्हणालं, 'नको मला!'

चिमणीनं आणला तांदूळदाणा
बाळानं नुसत्या हलवल्या माना.

चिमणीनं आणला अळीचा खाऊ
बाळ म्हणालं, 'उं हूं! ऊं हूं!'

रात्री बाळ बाहेर निजलं
पाऊस आला, चिंब भिजलं.

वारं सुटलं भर्र, भर्र,
फांद्या वाजल्या कर्र, कर्र!

बाळ गेलं भिऊन फार
बोललं, 'आई उघड दार!'

आईनं बाळाला घेतलं कुशीत
बाळ झोपलं अगदी खुषीत.

# झुळूक

सुळ सुळ सुळुक
आली आली झुळुक !

झुळ्केसरशी हलले पान
झाड लागले डुलवू मान
गवतामधुनी गेली लाट
खुद्कन हसली पाऊलवाट !

सुळ सुळ सुळुक
आली आली झुळुक !

फूल चिमुकले थरथरले
फूलपाखरू बावरले
पानांवरती साकळले
थेंब दवाचे ओघळले !

सुळ सुळ सुळुक
आली आली झुळुक !

पाखरु लागे उंच उडू
बागडते वेडे करडू
अंगातुन भरले वारे
नाचू या आपण सारे !

सुळ सुळ सुळुक
आली आली झुळुक !

## चोरी

बागेमध्ये जाऊ
झाडेवेली पाहू
सावध रहा आधी
चोरी नाही साधी!

फुलून आली सायली
वाट बघत राहिली
फुले तोडा चार
हलका करा भार.


गुलाब काही खुडू
फांदी नका मोडू
कळी गोजिरवाणी
दुखवू नका कुणी!

जाळीमागे लपा
आवाज होईल, जपा.
पाऊल टाका हळू
कुरकुर करील वाळू.

अरे! या तर आजी
गाळण उडाली माझी!
हसून बोलती मला,
'भिऊ नकोस बाळा-

- चार फुले नेलीस
तर बिघडणार नाही!
बाग काही माझी
गरीब होणार नाही!'

२६०५ २६६८



## कासवआजोबा

कासवआजोबांचे वय वर्षे तीनशेसाठ
धक्के खाउन खाउन झाली टणक शहाणी पाठ.

मागे पुढे हलवत हलवत आपले चारी पाय
आजोबांची स्वारी अलगद लाटांमधुनी जाय.

किती कासवे, किती पिढ्या पाहिल्या आजोबांनी
शंभर पिले पाठीवरती वाहुन नेली त्यांनी!

समुद्रवेली, शंखशिंपले, मासे, पाणी खारे
कासवआजोबांना आहे ठाऊक सारे सारे!

मान काढता कवचामधुनी लिक लिक करता डोळे
आजोबांच्या आयुष्याचे दिवस निघून गेले.

अता सांगती पोरांना ते चार हिताच्या गोष्टी
कुणि न ऐकते म्हणुन आजोबा मनात होती कष्टी!

## शेजारची चिमणी

दारावरती टक टक करते
शेजारची चिमणी घरात शिरते.

गुलाबी रिबन, गुलाबी झगा
चिमणीचा एकदा रुबाब बघा -

कोचावरती हलवत पाय
बसून चिमणी बिस्किट खाय.

चिमणी घेते उचलून फोन
उगाच म्हणते, 'हॅलो, कोण ? '

इंग्रजी पेपर हातात धरते
तोंडातल्या तोंडात 'यस नो' करते!

उघडते कपाट, पुस्तके चाळते
एकटी एकटीच मजेत खेळते

एकदम म्हणते, 'कंटाळले बाई!'
चिमणीला होते उडायची घाई!



## नागोबा

नागोबा नागोबा
नेहमी कुठे असता ?
नागपंचमीलाच
रस्त्यावर दिसता.

नागोबा तुमचं
पिवळाधमक रंग
सळसळ चाल
चमकदार अंग.

पुंगी ऐकून कसे
लागता बरे डोलू ?
नागोबा तुम्हाला
दूध लाह्या घालू ?

कधी बरे नागोबा
शिकायला गेलात शाळा ?
फणेवर दहाचा
आकडा कसा आला ?

## अडचण

मांजरीसारखे चाटून पुसून
अंग सगळे करीन साफ
पाणी काढा, आंघोळ घाला
आई तुला कशाला ताप ?

चावून चावून तसाच खाईन
काकडी, वाटाणे, गाजर, मुळा,
भाजी चिरा, फोडणी द्या-
उगीच कशाला गॅस जाळा ?

पुस्तकांचे केवढे ओझे ?
मान, खांदे, दुखतात पाय !
पाखरांसारखे भुर्र उडावे
शाळा बिळा करायची काय ?

पांघरुणाच्या ढिगाऱ्यात मी
घरटे करून झोपेन आई;
गादी घाला, गादी काढा
कटकट तुला होणार नाही !

मनी, मोत्या, चिमणी, कावळा
यांना कपडे असतात कुठे ?
चड्डी सुद्धा घालायला नको-
तेवढेच जमणार नाही बेटे !

## श्रीमंत

इंद्रनीळ आभाळ
पाचूहिरवे गवत
असे असे अफाट
डोळ्यांत नाही मावत !

हिरव्यानिळ्या पात्यांवर
लखलखतात हिरे
हिरे म्हणजे हिरे—
खोटे नव्हेत, खरे !

घळकन ओघळते
अळवावरचे पाणी
इतके मोती एकदम
पाहिले आहेत कुणी ?

तेरड्याने तर केला
देवालाच नवस-
'रंगांचा दे बहार
असेना चार दिवस ?'

तऱ्हेदार पाकळीचे
माणकाचे अंग
कस्तुरीच्या मातीवर
लालजांभळे रंग.

प्राजक्तावर केशरी
पोवळ्याचे देठ
ताईची नखे
की बाळाचे ओठ ?

भाद्रपदाच्या महिन्यात
बाग भराला येतो
गरिबासारखे गरीब आम्ही
एकदम श्रीमंत होतो !

## आलो रे बंडू थांब!

ओसरून गेलीय पावसाची सर
आई मला बाहेर जाऊ दे बरं!

अभ्यास कधीच झालाय सारा
पानं देखील वाचली चार.

नकाशातली गावं झालीत पाहून
गृहपाठ सगळा ठेवलाय लिहून.

वाचून वाचून दुखले डोळे
बघू दे आता आभाळ निळे.

झाडे बघ ना हिरवीगार?
प्राजक्तावर चिमण्या चार!

रस्त्याच्या कडेला वाहतोय ओग
पाण्यात पावलं बुडवीन जरा.

आलो रे बंडू थांब- आई जातो
होय ग बाई! लौकर घरी येतो!

## वरात

रोज रात्री आमच्या घरात
झुरळाच्या लग्नाची निघते वरात.

झुरळांचे गणगोत खूपच मोठे
मोठ्यांसंगे निघतात छोटे

तोऱ्यात चालतात विहीणबाई
मागे बिचारी नवरीची आई!

नवरदेवाच्या थरथर मिशा
मुंडावळ्याच शोभतात जशा!

नवरी नेसते तांबडा शालू
म्हणते, 'दागिने कुठले घालू?'

झुरळांची वरात घरभर फिरते
कपाटाखाली अलगद शिरते.

झुरळांच्या लग्नात मेजवानी काय?
थोडेसे खरकटे, थोडीशी साय.

फ्रिजमधली हवा थंडगार छान
नवरानवरी गाठतात माथेरान!

## ढोलकं झालं बोलकं

ढोलकं झालं बोलकं, वाजू लागला बाजा,
बाहुलीच्या लग्नाची काय सांगू मजा ?

दारी इवलं इवलं
आधी घातलं होतं बोहलं
मांडवात वऱ्हाड्यांची सुरू झाली ये जा !

बोळकंभर भात
त्यात पंक्ती उठल्या सात
गोडासाठी केला होता सांजा ताजा ताजा

छान छोटी राणी
होती नवरी गोजिरवाणी
शेजारणीचा बाहुला होता नवरदेव राजा !

दिले शालू शेले
सारे मानपान केले
विहिणीच्या रूबाबाचा केवढा गाजावाजा !

अंगणातून घरात
काढली मांजरावरून वरात
गाणी गाता गाता बाई घसा बसला माझा !
ढोलकं झालं बोलकं, वाजू लागला बाजा,
बाहुलीच्या लग्नाची काय सांगू मजा !

## बाळूचा आजार

थट्टा करत नाही, खरंच सांगतो आई
आजकाल मला किनई बरंच वाटत नाही!

अंगामध्ये सारखा मुरलाय ताप बारीक
त्याच्यावर बरी म्हणतात खोबरं अन् खारीक.

ही बघ, पाहिलीस? केवढी आली शिंक!
सर्दीसाठी खातात म्हणे तळलेला डिंक.

दुखू लागतं डोकं नेमकं अभ्यासाच्या वेळी
त्याच्यावर उत्तम उपाय तुपातली केळी.

पुस्तक समोर धरलं तरी डोळ्यांत येतं पाणी
त्याच्यासाठी खावं म्हणतात गुलकंद लोणी!

पहाटेच्या वेळी तर उठवत सुद्धा नाही
चार बदाम भिजवून खीर करशील आई?

तोंडालाही चव नाही : जीभ झालीय कडू
लौकर औषध दे बघू, मागून नको रडू!

## फुगे फुगे

बंड्याने उडवले साबणाचे फुगे
मोठे धावले पुढे, छोटे राहिले मागे!

काचेसारखे नितळ चमकदार अंग
फुग्यांवरती झळकले निळेजांभळे रंग

आजोबांच्या टकलावर टेकला एक फुगा
बंड्या बोलला, 'आजोबा, गंमत तरी बघा!'

एक फुगा ताईच्या वेणीवर बसला
केसांतले फूल तसा चमकून दिसला.

एका फुग्याने गाठले सैपाकघर थेट
शिंक्यामधल्या भोपळ्याची त्याने घेतली भेट.

एक फुगा वेड्यासारखा हेलकावत गेला
जास्वंदीच्या झाडामागे दिसेनासा झाला.

एक फुगा बाळाच्या गालावर फुटला
बाळाला तो कुणाचा तरी पापाच वाटला.

गुदगुल्या झाल्या गोड, खुदकन आले हसू
बाळ पण लालगुलाबी फुगा लागले दिसू!



# बाबा

बाबा माझे आवडती भारीच मला
असे बाबा आहेत का सांगा कुणाला ?
बाबा बंदुक उचलुन घेती
सैरावैरा हत्ती पळती
वाघ सिंह थरथरा कापती
बिळात जाऊन कोल्हे लपती
असा शूर शिपाई का कुणी पाहिला ?

हपिसामध्ये बाबा जाती
सारे वाकुन सलाम करती
बाबा नुसत्या सह्या ठोकती
हजार रुपये मोजुन घेती
मखमली खुर्ची त्यांना बसावयाला !

कधि गाण्याची बसते बैठक
केव्हा नक्कल, केव्हा नाटक
बाबा होती कधी विदूषक
उडी मारती होऊन बेडुक
दोस्तांमध्ये माझ्या त्यांचा मान पहिला.

बाबा येती संध्याकाळी
मला उचलुनी घेती जवळी
खाऊ खेळणी सुंदर सगळी
चिकलेट, चॉकलेट, लेमनगोळी
खाऊपेक्षा गोडी जास्त त्यांच्या पाप्याला !

बाबा माझे आवडती भारीच मला
असे बाबा आहेत का सांगा कुणाला ?

## हरवलं हसू

माझ्या बाळाचं हरवलं हसू
बाळ करतंय ग मुसुमुसू !

कोण बाळाशी माझ्या भांडलं ?
रडू छातीत कधीचं कोंडलं !
गाल लाल लाल लागलेत दिसू
बाळ करतंय ग मुसुमुसू !

काय धावताना बाळ माझं पडलं ?
काय लाकडाचं घोडं अडलं ?
कसं कुशीत बघतंय घुसू
बाळ करतंय ग मुसुमुसू !

कुणी बाळाचा नेला खाऊ ?
हात माऊ ग हात चिऊकाऊ !
नका घरात आमच्या बसू
बाळ करतंय ग मुसुमुसू !

कुणि बाळाची काढली खोडी ?
त्याची उन्हात बांधू माडी !
आलं बाळाला खुदकन हसू
बाळ करतंय ग मुसुमुसू !

# घाई

हे ग काय आई ? थांब ना ग बाई !
तुझी आपली माझ्यामागे सदाचीच घाई.

परीच्या कहाणीत भरतो जरा रंग
तोच म्हणतेस, 'चल, धुवून घे अंग.'

बकुळीची माळ गुंफून होते अर्धी —
'अभ्यासाला बसा !' आतून येते वर्दी !


रेडिओवर लागतात सिनेमाची गाणी
तेव्हा नेमके म्हणतेस, 'घालून घे ग वेणी !'


अंगणामध्ये आम्ही लंगडी घालतो जेव्हा
हाक तुझी आपली ठरलेली तेव्हा-

'चला चला जेवायला, पानं ठेवलीत वाढून !'
यावं लागतं आम्हाला खेळ तस्सा सोडून.

आणि रात्री गॅलरीतून शेजारची कला
शाळेतल्या गंमती सांगत असते मला,


जरा कुठे गप्पांत येऊ लागते मजा-
तर म्हणतेस, 'दहा वाजले, चला आता निजा !'





## फुलपाखरे

पाहिली आहेत का कधी फुलपाखरे तुम्ही ?
पाहिली आहे नक्षी पंखावरची नामी ?



मखमलीहून मऊ फुलपाखराचे अंग
पंखांवर खुलतात तऱ्हेतऱ्हेचे रंग.

फिके निळे गुलाबी, गडद जांभळे लाल
कधी तर पांघरतात तपकिरी शाल !

काही स्पष्ट ठळक, काही फिके मंद
काहींच्या पंखांवर सोनरुपेरी बुंद.

फुलपाखरे फुलांत अशी जातात मिळून
फुलावेगळी कधी येत नाहीत कळून !

कधी करतात पंखांची जलद उघडमीट
कधी सूर मारतात हवेमध्ये नीट.

फुलपाखरे असतात फुलांचे मित्र
त्यांच्यावाचून अपुरे बागेचेही चित्र !



## आई, समज-

आई, समज छताला लागले माझे पाय
तर मला खाली दिसेल काय काय ?

मी आपला छतावरून मजेत चालेन
वरूनच तुमच्याशी अचानक बोलेन !

बाबांच्या टकलात पंखा गोल फिरत राहील
तुझ्या केसांतले फूल माझ्याकडे नवलाने पाहील.

दिसतील उलट्या बिनपायांच्या टेबलखुर्च्या
आणि उलट्याच तजबिरीही भिंतीवरच्या-

जमीन होईल छत, वर गालिच्याची नक्षी
रांगते बाळ छतावरचाच उडता पक्षी !

उलट्या खिडकीत उलटे आभाळ, उलटे झाड,
डोकावून बघेन काय असते ढगांआड ?

दारातून माणसे येतील दिसणार नाही त्यांना
मी बोलतो कुठून ? कळणार नाही त्यांना !

तू कंटाळशील, म्हणशील, 'ये ना राजा खाली ?'
मी येईन- आधी चॉकलेटची करून बोली !

## आम्ही रानपऱ्या

आम्ही रानपऱ्या, रानपऱ्या!
वनात वसतो, फुलांत हसतो, मुलांस दिसतो खऱ्या!
आम्ही रानपऱ्या!

पाठीवर पंखांची जोडी
हृदयांमध्ये अथांग गोडी
इवल्या इवल्या सान बाहुल्या, आनंदी हासऱ्या!

दवबिंदूंचे काचबंगले
घरकुल अमुचे तिथे चांगले
हिरव्या रानी, पानोपानी वसाहती साजऱ्या!

चांद झळकतो आभाळावर
करांत तेव्हा गुंफुनिया कर
आम्ही नाचता घुमू लागती जादूच्या पावऱ्या!

हात नका पण आम्हा लावू
जवळ येउनी नकाच पाहू
झटकन आम्ही उडून जाऊ मुलखाच्या लाजऱ्या!

आम्ही रानपऱ्या!

## एकेकाचे बाळ

सिंहाचे बाळ गर्जवते रान
थरथरते झाडाचे पान न पान.

वाघाच्या बाळाचे गादीचे पाय
हिरवळीवरून दबकत जाय.

हरणाच्या बाळाला वाऱ्याचा वेग
धावताना दिसते नुसतीच रेघ.

सशाच्या बाळाच्या टुणटुण उड्या
लुबुलुबु ओठांनी चावते काड्या.

फुलपाखरू बाळ म्हणजे छान छान रंग
पंखांची उघडमीट करण्यात दंग!

मोराचे बाळ मिजासखोर भारी
पाचू-नीळ पिसारा लखलख करी.

हत्तीचे बाळ तर गबदुलराव
सर्कशीत त्यांना भलताच भाव.

जिराफाच्या बाळाची लांबलचक मान
डोक्यावर काय? शिंगे की कान?

उंटाच्या बाळाच्या पाठीला बाक
सारे बिचाऱ्याला मुरडतात नाक.

माणसाचे बाळ मात्र पाळण्यात खेळते
किती तरी दिवस दुपट्यात लोळते-

माणसाचे बाळ पिते गोड गोड दुदू
स्वत:शीच हसते खुदु खुदु खुदु!

## बाळाचे न्हाणे

तेल लावते
टाळू भरते
आई बाळाला
तो तो करते

वाफा उन्हून
पाणी घेऊन
बाळ मजेत
आले न्हाऊन

बाळ उजळ
तीट काजळ
आई पुशिते
ओले जावळ



मऊ बिछाना
आहे मजा ना ?
आई बोलते बाळा निजा ना ?

येतो पाळणा
जातो पाळणा
वर मोत्यांचा
झुले खेळणा.

गाई आली ग
जड झाली ग
झुके पापणी
आता खाली ग !

गाल उठून
डोळे मिटून
बाळ झोपले
गुरगुटून !

## लाडुकला

मन्या माझा लाडुकला
मऊ मऊ त्याचे अंग
काळीभोर मखमल
तसा चमकतो रंग.

भला थोरला जबडा
कधी उघडतो संथ
दोन सुळे दाखवत
देतो जांभई निवांत.

छोट्या नखांचे खंजीर
मऊ पंज्यांच्या म्यानात
पाय लांबवतो मन्या
तेव्हा बाहेर येतात.

चार पायांवर कधी
अवचित उभा राही
करी पाठीची कमान
पुन्हा देतसे जांभई.

लालचुटुक जिभली
जरा बाहेर काढून
काळे मखमली अंग
घेतो चाटून पुसून.

अवचित मग अंग
माझ्या पायांशी घासतो
'म्यांव' करी तेव्हा मन्या
किती सुंदर दिसतो!

## टप टप टपक

टप टप टपक
टिप टिप टिपक
सळ सळ सळाळ
खळं खळ खळाळ
दिशांना वेढत ये
ये रे ये पावसा ये !

उन्हात जळते भुई
डोईला सावली नाही
गरम वाहती वारे
तापली घरे नि दारे
गड गड गडाड
धड धड धडाड
ढगांना ओढत ये
ये रे ये पावसा ये !

चढू दे आभाळी ढग
निवव अंगाची धग
वाहू दे झुळूक ओली
फांद्यांना वाकव खाली
टपोऱ्या गारांत
मुसळधारांत
झाडांना झोडत ये
ये रे ये पावसा ये!

खळाळ, ओहळ, पाणी
तुझीच गातील गाणी
अंगणी साचेल तळे
मोत्यांची पागोळी गळे
चिंब चिंब अंगाचा
सावळ्या रंगाचा
सोहळा मांडत ये
ये रे ये पावसा ये!

## चांदपरी

डोळे मिटा डोळे मिटा
बघू नका चोरून
चांदपरी येते आहे
चंद्रलोकावरून
चांदपरी येते आहे
फार फार दुरून !

पाऊल तिचे हलकेफूल
नकळत येते खाली
चांदण्याचे बोट लावते
हळूच तुमच्या गाली
अंगावर ओढून घेते
चांदण्याच्या शाली !

चांदण्याचा कवडसा तशी
चांदपरी चालते
मिटल्या मऊ पापण्यांवर
सहज फुंकर घालते
मग तुमच्या झोपेमध्ये
नवे जग फुलते

स्वप्नामधल्या जगात तुम्ही
गमतीगमती पाहाल
सात मजली आठ चौकी
सुंदर ऐनेमहाल
दोस्त सारे घेउन संगे
मजेत तिथे राहाल!

मैना घेइल ताना आणि
मोर लागेल नाचू
लिंबायेवढे मोती आणि
पेरूयेवढे पाचू
अंगणामध्ये हिरेमाणके
'किती' म्हणाल 'वेचू?'

डोळे मिटा डोळे मिटा
बघू नका चोरून
चांदपरी येते आहे
चंद्रलोकावरून
चांदपरी येते आहे
फार फार दूरून!

## माझे संस्कृत

मलाहि येते पहा संस्कृतम्
बोलत नाही मुळी प्राकृतम्
नियमित करतो मी अभ्यासम्
आईला नच देतो त्रासम्

बाळु लाडका माझा मित्रम्
देतो त्याला खाऊ, चित्रम्.
थोडा खेळम्, मग व्यायामम्,
मधुनी मधुनी करतो कामम्

तब्येतीने जरि मी लठ्ठम्
शाळेमध्ये नाही मठ्ठम्
जरी न मिळती मार्क शंभरम्
तरिही येतो वरी नंबरम्!



## घोडा

आला आला आला माझा जादूचा घोडा
वाट सारे सोडा अरे वाट आधी सोडा!

जादूच्या या घोड्याला नको चारापाणी
त्याला आवडतात नुसती पाखरांची गाणी
खुशाल आड येऊ द्या समुद्र, नाला, ओढा
ओलांडून जातो माझा जादूचा घोडा!

जादूच्या या घोड्याला लागत नाही लगाम
त्याच्यापुढे झुकून तुम्ही नुसता करा सलाम
शेपटीचा एक केस धरून जरासा ओढा
उंच भरारी घेतो माझा जादूचा घोडा!

केव्हा बघतो वरती केव्हा बघतो खाली
टप टप टापा टाकी चाले दुडक्या चाली
अरे काय हे दिसते?— मामाचा वाडा
किती गुणाचा आहे माझा जादूचा घोडा!

## खंडाळ्याच्या घाटात

हिरवी झाडी पिवळा डोंगर
निळीजांभळी दरी
बेट बांबुचे त्यातुन वाजे
वाऱ्याची पावरी.

कभिन्न काळ्या खडकामधुनी
फुटति दुधाचे झरे
संथपणाने गिरक्या घेती
शुभ्र शुभ्र पाखरे.

सोनावळिच्या सोनफुलांचा
बाजुस ताफा उभा
तलम धुक्याची निळसर मलमल.
उडते, भिडते नभा

हिरवी ओली मखमल पायी
तशी दाट हिरवळ
अंग झाडतो भिजला वारा
त्यात नवा दरवळ.

डूल घालुनी जळथेंबांचे
तृणपाते डोलते
शीळ घालते रानपाखरू
माझ्याशी बोलते.

गोजिरवाणे करडू होउन
काय इथे बागडू ?
पाकोळी का पिवळी होउन
फुलांफुलांतुन उडू ?

## चंद्रवीर

आधी मारली तळ्यात बुडी
मग घेतली आभाळात उडी
पंखांसारखे पसरले हात
वाऱ्यासंगे गेलो वाहात!

सात समुद्र : डोंगर सात
ओलांडले मी एका दमात
मेरूपर्वतावर ठेवला पाय
तेव्हा मला दिसले काय?

लखलख उजेड समोर कसला?
तो तर होता चंद्र हसला!
चंद्राभोवती मारली फेरी
पाणी जांभळे, वाळू रुपेरी-

वाळूत अलगद पाऊल ठेवले
तिरंगी निशाण तिथे रोवले
पन्नास फोटो घेऊन टाकले
चंद्रपाषाण खाली फेकले

पुन्हा चंद्राला मारली फेरी
मग सरळ आलो घरी
आता जेव्हा चंद्र दिसतो
मला बघून खुदकन हसतो!

# आई, मी अमिताभ आहे

आई मी अमिताभ आहे खोटं नाही काही!
मी अगदी कुणाला सुद्धा मुळीच भीत नाही.

मी एक फाईट मारतो चोर जातात पळून
मी एक बॉंब फेकतो विमान जातं जळून!
पन्नास गुंडांबरोबर मी एकटा लढतो
पाच मजली इमारतीवर मी सहज चढतो
डोंगरावरून मारतो उडी थेट नदीपल्याड
मोटारींच्या टपांवरून धावतो धाड धाड!

आई, मी अमिताभ आहे, हसू नकोस अशी
कधी माझी मोठी दाढी, कधी छोटी मिशी
कधी तर डोळ्यांवरती असतो गो गो गॉगल
कधी मी भोळाभावडा, कधी अगदी पागल!
कधी गाणे गात गात मी जातो मरून
दुसऱ्या सिनेमात पण जिवंत होतो फिरून!

आई मी अमिताभ आहे पडद्यावरचा राजा
साऱ्यांनाच जबरदस्त धाक वाटतो माझा
कधी हातांत 'माइक' धरून 'डिस्को' मध्ये नाचतो
कधी प्रोफेसर होऊन जाडी पुस्तकं वाचतो.
कधी ढिशुम ढिशुम, कधी भाषण करतो झकास
सारे प्रेक्षक तेव्हा कसे आवरून धरतात श्वास!

एका वेळी चार अमिताभ चार सिनेमांत दिसतात
खरा कोण कळत नाही, लोक वेडे फसतात!

## कधीतंरी

कधीतरी केव्हातरी
पायांखाली तापलेली
भुई असू दे,

कधीतरी केव्हा तरी
ऐन दुपारचा सूर्य
डोळां दिसू दे!

अनवाणी पावलांना
काट्याकुट्यांचीही कधी
सवय हवी,

हळव्याशा अंगठ्याला
अवचित लागणारी
ठेचही हवी.

नेहमीच नको छत्री
कधीमधी पावसात
माथा भिजू दे,

नेहमीच नको पंखा
कधी तरी उकाड्यात
अंग शिजू दे.

चांदण्याची रोषणाई
लखलखे, तरी कधी
काळोख पहा,

माणसांच्या गर्दीतही
कधी तरी केव्हा तरी
एकटा रहा!

# बाबा कामाला निघतात तेव्हा

बाबा कामाला निघतात तेव्हा
आई लगबग सामोरी येते
वाफाळ चवदार चहाचा कप
हसत बाबांच्या हातात देते.

बाबा कामाला निघतात तेव्हा
रुमाल नेमका बेपत्ता होतो
दादा मग आपला रुमाल
हळूच त्यांच्या खिशात ठेवतो.

बाबा कामाला निघतात तेव्हा
ताईची केवढी उडते धांदल
बाबांचे बूट शोधण्यासाठी
घरभर नुसती होते दंगल!

बाबा कामाला निघतात तेव्हा
आजीला लगेच आठवते सारे,
‘कामाचे कागद घेतलेस ना रे?’?
स्कूटर हळू चालवत जा रे!’

बाबा कामाला निघतात तेव्हा
बाळ नुसतेच ‘टाटा’ करते
बाबांना त्या हाताची सोबत
दिवसभर ऑफिसात पुरते!

## ते नाहीच माझे रूप

बाहेरून दिसतो तुम्हांला ते नाहीच माझे रूप
माझ्या मनात चालू असते सतत काही खूप खूप
शाळेमध्ये बाकावर देवासारखा बसून असतो
तेव्हा खरोखर सांगतो मी वर्गात मुळीच नसतो.

मी असतो एक देखणा, उमदा, तरुण राजकुमार
जर्द निळा अबलख घोडा, त्याच्यावर मी होतो स्वार
रानेवने दऱ्याखोरी ओलांडून मी दूर जातो
तास संपण्याआधी पुन्हा दौड करून परत येतो.

कधी माझ्या हातात असते गुलबकावलीचे फूल
कधी लखलख हिरेमाणके बघताक्षणी पडते भूल!
कधी राक्षसांशी लढून मी रक्तबंबाळ होतो
किल्ल्यामध्ये बंदिस्त अशी राजकन्या घेऊन येतो!

कधी समुद्र, कधी आभाळ, कधी चंद्र, कधी तारे,
मनात येईल तिकडे जातो, पृथ्वीलाही घालतो फेरे
आता सुद्धा खिडकीपाशी हलते आहे हिरवे पान
ते मीच आहे! मला ओळखले नाही? छान, छान!

## साद घाली रानवारा

हात गळ्यात टाकून लावतसे लळा
साद घाली रानवारा, ' सहलीला चला '

कोंडलेली हवा आणि बंदिस्त हे घर
अडविती चार भिंती, वरचे छप्पर,
ओलांडून उंबरठा पाऊल उचला
साद घाली रानवारा, ' सहलीला चला '

निळ्या आभाळाची ओढ वाऱ्याचा सोसाटा
पायांतळी फुटतील नव्या नव्या वाटा
एक उंच सूर लावा खुलवून गळा
साद घाली रानवारा, ' सहलीला चला '

हिरव्या या धरतीची ऊबदार माया
गर्द झाडी निळ्या काळ्या लडिवाळ छाया
पहा तरी निसर्गाचा साजरा सोहळा
साद घाली रानवारा, ' सहलीला चला '

झुळझुळ झरा कुठे, डोह कुठे खोल,
शेवाळल्या गोट्यांवर सावरा रे तोल,
पायां वेटाळून पाणी वाहे खळखळा
साद घाली रानवारा, ' सहलीला चला '

माथा मोरपीस आणि गुंजमाळा गळा
संगे गोपाळांचा मेळा, गोड दहीकाला
सहलीला नित्य जाई श्रीकृष्ण सावळा
साद घाली रानवारा, ' सहलीला चला '

## मन्या बोक्याची डायरी


झोप चांगली झाली म्हणून
उठलो, आळस दिला ताणून

दूधवाला भय्या आला
बशीत दूध ओतून गेला
चाटून पुसून घेतली बशी
पुसले तोंड, पुसली मिशी
पाव खाल्ला ताजा ताजा
उन्हात चाटत बसलो पंजा

दुपारी मिळाला एकच मासा
तेवढा मला पुरणार कसा?
जेवण अगदीच होते भिकार
म्हणून उंदराची केली शिकार
मग जरासा बागेत हिंडलो
मोत्या कुत्र्याशी उगीच भांडलो!

बेबीने मला घेतले कुशीत
घुर्र घुर्र आलो खुषीत
दिवाणखान्यामधला कोच
सगळ्यात मला आवडतो तोच
अंग सारे सैल सोडले
पायांभोवती शेपूट वेढले
छप्पर भिंत लांब गेली
मांजरपावली झोप आली!

स्वप्नामध्ये येइल जाग
जंगलामधला होइन वाघ
झऱ्यावरती पिईन पाणी
वाघीण होईल माझी राणी
अंगावरचे चट्टेपट्टे
जागेपणी जातात कुठे?



## एक मांजरी हिंदुस्तानी

एक मांजरी हिंदुस्तानी इराणमध्ये आली
नवा देश अन् नवी माणसे बघुन जराशी भ्याली.

इराणमध्ये बदामपिस्ते झाले असती स्वस्ते
खुषीत येउन म्हणुन मांजरी मिशीत हलके हसते.


बदाम पिस्ते अक्रोडांनी फुलल्या पेठा, रस्ते,
'दूध नको मज' म्हणे मांजरी 'बदाम खाइन नुस्ते!'

शुभ्र मशीदी, शुभ्र मनोरे, कुराण वाची मुल्ला
गुडघे टेकुन नमाज पढते मांजर म्हणते 'अल्ला!'

नंतर मांजर बाजारातुन फेरी मारून आली
लाल गालिचा, पश्मीन्याची शाल खरेदी केली.

रेशिमपिशवी भरून नेली नाणी बाजारात,
सोने घालुन अंगावरती मांजर बसली गात.

घाबरली पण एक दुकानी दिसता काळा बुरखा-
'चला' म्हणाली, 'अपुल्या देशी, देश नको हा परका!



## मांजरांचा गाव

मांजरांचा गाव आहे अगदी छोटा छोटा
एक कचेरी, दोन शाळा, तीन बाजारपेठा.

बाजारपेठेमध्ये असते उंदरांची रास
झुरळांचे ढीग त्यांना माशांचा वास!

पुराणाला संध्याकाळी जातात मांजरआजी
बाजारातून घेऊन येतात उंदीरपिले ताजी;

मांजरपोरे अभ्यास सोडून धावतात उंदरांमागे
तेव्हा त्यांचे गुरुजी त्यांना खूप भरतात रागे.

'कोंबडी एके कोंबडी : कोंबडी दुणे ससा'
मग पोरे परवचा घोकत बसतात असा.

बोके करतात कचेरीत मान मोडून काम
तरी सुद्धा त्यांना कधी येत नाही घाम.

मनूताईचा सैपाक तर असतो अगदी सोपा
चुलीवरच बसून त्या मस्त काढतात झोपा!

'दूधपंचमी' साजरी करतो मांजरांचा गाव
दूध-पेढे-बासुंदीला तेव्हा येतो भाव.

येरव्ही मात्र मांजरगावी नका बरे जाऊ
चहासोबत उंदीर तळून तेच घालतात खाऊ!

## मनूताईंचा इराणी भात

मनूताईंनी नवी नवी पक्वान्ने घेतली शिकून
तेव्हापासून बोकोबा पार गेले आहेत थकून!

मनूताई बोलल्या, 'करू इराणी भात चेलो'
बोकोबा म्हणाले, 'अरे बाप रे! मेलो मेलो मेलो!'

मनूताई म्हणाल्या, 'आधी पावशेर आणा बदाम'
बोकोबा म्हणाले, 'माझे आई! खिशात नाही छदाम!'

मनूताई म्हणाल्या, 'आणखी शेरभर हवेत पिस्ते'
बोकोबा म्हणाले, 'वा वा! अग, आहेत का ते स्वस्ते?'

— 'झालंच तर मूठभर हव्यातच बाई मनुका'
बोकोबा म्हणाले, 'पैसे आता चोरी करून आणू का?'

— 'भात शिजवायला लागेल बरं का लोणकढं तूप!'
बोकोबा म्हणाले, 'होय का? खूप खूप खूप!

— मी म्हणतो, भात राहू दे, नुसतेच उंदीर तळ'
मनूताईंनी फेकले लाटणे, बोकोबांनी काढला पळ!

## मुशाफिराचे गाणे

आभाळ झुलते वरी विलगते ते क्षितिजाच्या काठा
पाउल माझे ओढुन नेती दूरदूरच्या वाटा!

दहा दिशा या खुल्या भोवती फिरे मोकळे वारे
सांगा मजला कशा अडवतिल भिंती, खिडक्या, दारे?
अशा घडीला बसून राहिल घरात तोच करंटा!

स्वारीसाठी मला मिळावा उमदा अबलख घोडा
मधुनी मधुनी सावलीत अन् हवा विसावा थोडा
खाइन भाकर, लाविन पाणी ओंजळ भरुनी ओठा.

घोडा माझा चपळ धावता भरेल अंगी वीज
नवनवलाई बघता कुठला कंटाळा वा नीज?
वाऱ्यालाही टाकिन मागे दौडत जाता जाता!


डोंगरराने पाहिन, पाहिन दूरदूरचे देश,
कशी माणसे? कुठल्या भाषा? कसे तयांचे वेष?
कुणिही देइल मुक्कामाला जागा- पडवी, ओटा.

विशाल गवती कुरणे कोठे, रणरण कोठे वाळू,
कुठे चांदणे निथळे, कोठे सूर्य पाहतो जाळू
फिरस्त्यास पण मुशाफरीचा काय फायदा, तोटा?

जग अवघे मी हिंडुन येइन पुन्हा अचानक दारी
कुतूहलाने माझ्याभवती होतिल गोळा सारी
म्हणतिल आणिक, 'अरे! तोच हा! किती जाहला मोठा!'

साडी नेसुन लाजत मुरकत येइल पुढती ताई
असतिल बाबा जरा वाकले, थोडी थकली आई
भरविल मजला ती बाळाच्या घासामधला वाटा!

# दिवाळी




आली आज दिवाळी रे!
नटल्या पेठा, नटल्या वाटा नटली आळी आळी रे
आली आज दिवाळी रे!
दिवे लटकती घराघरांवर
विमान, तारा, झेला सुंदर
कुठे केशरी प्रकाश ढाळी संगमरवरी जाळी रे!

ओटीवरुनी, सज्जावरुनी
पणत्या बसल्या रांगा धरुनी
पटपट पटपट दीप पेटती फुलत्या सायंकाळी रे!



इकडे ज्योती, तिकडे ज्योती
ज्योती खाली, ज्योती वरती,
प्रचंड तवकी उजळुन ज्योती कोण कुणा ओवाळी रे?

अवचित येतो सुरेख दरवळ
करी करंजी तुपात सळसळ
लाडू, खाज्या, चकल्या ताज्या, खमंग शंकरपाळी रे.



चला पुस्तके दडवुन ठेवू
अभ्यासाला बुट्टी देऊ
उडू, बागडू, हसू, उनाडू आता सांजसकाळी रे.

भाऊबिजेचा दिवस आगळा
ओवाळणिचा रम्य सोहळा
ताइबाइला जरीखणाची देऊ परकरचोळी रे!







## आवडनिवड

बेबी घालते मिडी मॅक्सी, बंड्या घालतो सफारी सूट
बेबीला लागतात टपटप सँडल्स आणि बंड्याला चकचक बूट
मला आवडते खणाची चोळी, हातमागाची सुती साडी
बेबी बंड्या चेष्टा करतात, म्हणतात, 'आमची ताई वेडी!'

बेबीला हवे चायनीज फूड, पिझ्झा, मटन पॅटिस, कटलेट,
चिकन नसेल तर बंड्याला निदान हवे झकास ऑम्लेट,
मला आवडते थालीपीठ, खिचडी, दुधातुपाशी पुरणपोळी
बेबी बंड्या म्हणतात कसे, 'ताई आमची अडाणी, भोळी!'

बेबीला आठ दिवसांमधून हिंदी सिनेमे लागतात पाच
इंग्रजी गाणी लावून त्यांवर बंड्या करतो डिस्को नाच!
कॉमिक्स वाचायला नसली तर त्यांना मुळीच करमत नाही
मला आपले शंकरपार्वती, यक्षराक्षस आवडतात बाई!

मोपेड, स्कूटर, मारुतीशिवाय बेबीबंड्याचे भागत नाही,
मला आवडते फिरायला जायला दूर दूर, पायी पायी.
लोक म्हणतात, 'सख्खी भावंडे, इतका त्यांच्यांत फरक कसा?'
मी आपली अशी आहे! हसायचे तर खुशाल हसा!

# आई

सकाळी कमी जेवलो तर आईला कसे नेमके कळते ?
दुपारच्या चहाबरोबर छानसे काही खायला मिळते
पायाला ठेच लागली तर आईला कसे लगेच दिसते ?
जखमेवर हलक्या हाती औषधाचा बोळा पुसते.

शाळेत बाई बोलल्या तर आईला पत्ता लागतो घरी
माझ्या छान अक्षराचे तीच तेव्हा कौतुक करी,
अभ्यास करून करून जेव्हा पाठीला माझ्या लागते कळ
आई म्हणते, 'अभ्यास पुरे. आता खेळायला बाहेर पळ !

माझे आवडते सायीचे दही, आंबटचिंबट लोणच्याची फोड
आई पानात वाढते तेव्हा जेवण काय लागते गोड !
कधी कधी माझ्या हातून वेड्यासारख्या होतात चुका
बाबा रागे भरतात पण आई फक्त घेते मुका !

आभाळ जेव्हा भरून येते घरभर भीती दाटते,
- आई नुसती जवळ असली तरी किती बरे वाटते.
कधी आई खूप चिडते, म्हणते, 'पोरटे भारी द्वाड !'
तरी सुद्धा- कळत नाही- माझे कसे करते लाड ?

## झाड लावलं झाड!

झाड लावलं झाड
अहो मी झाड लावलं झाड!


इवलं रोपटं आणलं कोणी
लावलं, घातलं खत, पाणी
गाइली त्याला गोड गाणी
ऊनपाउसवाऱ्यामध्ये सरसर झाली वाढ.

रोपानं वर केली मान
फुटल्या फांद्या, फुटली पानं,
हिरवं देऊळ गोजिरवाणं
बघता बघता झाड माझं झालं ताडमाड!

झाड वाढलं भरभर भरभर
डवरून आला त्यावर मोहर
सुगंध गेला दूरदूरवर
मोहर गळता लालशेंदरी किती लागले पाड!

जमल्या चिमण्या जमले पोपट
फांद्यांवरती बसले पटपट
काड्या जमवुन केली खटपट
घरट्यांमध्ये पिलांस त्यांनी जपलं जीवापाड

झाडासंगे मीहि वाढलो
केव्हा हसलो, केव्हा रडलो
कर उंचावुन नभास भिडलो
झाड म्हणजे मीच आणिक मी म्हणजे झाड
झाड लावलं झाड!
अहो मी झाड लावलं झाड!



## पानांचे गाणे

फूलगाणी गाइली याने आणि त्याने
आता जरा गाईन मी पानांचे गाणे!

झाडांच्या माथ्यावर पानांचा डेरा
फांदीच्या टोकाशी पानकोवळा तुरा.

फुले किती थोडी? पाने असतात फार
पाने किती छान! हिरवी हिरवी गार!

आंब्याची पालवी जांभळी आणि लाल
जसे काही यशोदेच्या बाळाचे गाल.

केळीच्या पानांतून सनईचे सूर
पक्वान्नांचा थाट : उदबत्तीचा धूर.

पिंपळाच्या पानांचे मऊ रेशमी तळवे
विड्याचे पान तर रंगदार हळवे.

पानांच्या सावलीत गुरे झोपा घेतात
पोळलेले पाय किती थंडगार होतात!

जाळीदार पान आहे पुस्तकात लपून
रेषांतून वाचतो जुन्या आठवणी जपून!

## आईची झोप

नका रे नका करू गोंगाट
घटकाभर बसा मुकाट
झोप आईची जरा होऊ द्या
थोडा विसावा तिला घेऊ द्या.

पहाटे कधी उठते आई
तेव्हापासून कामाची घाई
तिला घडीची उसंत नाही
भाजीवालीची आरोळी येई.

चहा कुणाला, कुणाला दूध,
कुणा पाण्यात घ्यायचा मध,
पाव कुणाला भाजून हवा
गॅसवरती तापतो तवा.

लावी कुकर, लाटते पोळ्या
जेवणारांच्या सारख्या पाळ्या
कामे संपता वाजले दोन
त्यात मध्येच कुणाचा फोन!

आता जराशी आडवी झाली
झोप निवांत डोळ्यांत आली
पुन्हा चहाची होताच वेळ
लगबगीने आई उठेल!

नका धडाडा वाजवू दारे
गाणी जोरात लावू नका रे.
नका खिदळू, नका ओरडू
झोप आईची नका रे मोडू!

## आला पाऊस पाहुणा

आला पाऊस पाहुणा!
जागजागी उमटल्या त्याच्या पावलांच्या खुणा
आला पाऊस पाहुणा!

ढग चढले आभाळी
छाया दाटे काळी काळी
झाडे डोलावून माना आज बोलविती कुणा?

थंडगार सुटे वारा
ओला उमटे शहारा
सारे दडले घरांत, रस्ता झाला सुना सुना!

धारा कोसळल्या खाली
भुई चिंब चिंब झाली
मातीलाही आला वास तोच ओळखीचा जुना.

झाला उजेड सावळा
रंग नवाच आभाळा
इथे तिथे चमकते वीज निळी पुन्हा पुन्हा.

चला अंगणात नाचू
थेंब तळहाती वेचू
गाऊ पावसाचे गाणे, गाऊ पावसाच्या गुणा.
आला पाऊस पाहुणा!

## बेबीची सकाळ

घड्याळात जेव्हा वाजतात आठ
बेबीची तेव्हा होते पहाट
जांभया देत बेबी उठते
पांघरूण नुसतेच पायाने लोटते.
पाळण्याजवळ थांबते थोडी
धाकट्या बाळाची काढते खोडी
बाथरूममध्ये जाते धावत
दातांना बेबी ब्रश नाही लावत!
तशीच करते खुळ खुळ खुळ
बेबी नुसती भरते चूळ.
चहा पिताना 'पेपर' चाळते
बातम्या तेवढ्या सगळ्या गाळते.
कुठचा सिनेमा लागणार कुठे,
तितकेच नेमके पाहून घेते!
'विविध भारती' ऐकत लोळते
आरशात बघत बटांशी खेळते!
आई म्हणते, 'आंघोळ उरकून टाक'
बेबी नुसतीच उडवते नाक.
शेवटी बाबांची थप्पड मिळते
बेबी उठते, आंघोळीला पळते!

## पंधराव्या मजल्यावरती

पंधराव्या मजल्यावरती आहे आमचे घर
लिफ्टमधून सुळकन आम्ही जातो खालीवर

खूप मोठी गच्ची : वारे येते बहारदार
दूर दूर चमचम करतो समुद्र निळाशार

गच्चीवरून खोल खाली दिसते झोपडपट्टी
कधी तिथून हाक येते, कधी वाजते शिट्टी!

नागडीउघडी मुले तिथली : काळा काळा रंग
सदा न् कदा काही तरी करण्यात असतात दंग.

मुले तिथली म्हणतात मला, 'भित्री भागूबाई!
पिंजऱ्यामधला पोपट नुसता, येतं तुला काही?'

आई म्हणते, 'राजूबाळा बघू नकोस तिकडं
घाणेरडी ती पोरं मेली वळण त्यांचं वाकडं!

शैलू, शावक, जेनी, दीप, दिना- तुझे मित्र
त्यांच्याबरोबर खेळ नाही तर काढत बैस चित्रं!'

नेहमीचे ते दोस्त, त्यांचे तेच तेच खेळ
कंटाळाच येतो जाता जात नाही वेळ.

काय झाले मीच कधी खाली गेलो तर...?
काय झाले खालची मुले वरती आली तर?

वाकून वाकून बघतो खाली मला येते रडू
थंडगार गोड आइस्क्रीम उगीच लागते कडू!

## तळ्याचे गाणे

मी एक तळे माझे पाणी निळे निळे
मधूनच हलकीशी लाट सळसळे,

काठावर डुलतात लव्हाळ्याचे तुरे
इथे तिथे चमकती थेंब जसे हिरे.

उभी जरा पलिकडे वनराई दाट
पानांतून पाखरांचा गोड किलबिलाट.

पाण्यामध्ये उतरले उलटे आभाळ
कधी दिसे उडणारी बगळ्यांची माळ.

अरे मुला, बैस जरा, बैस माझ्यापाशी
पहा तरी भोवताली शोभा दिसे कशी!

धडपड थांबवून बैस जरा शांत
पाण्यामध्ये प्रतिबिंब बघत निवान्त!

पहा जरा निरखून निर्मळ हा तळ
बोटभर मासोळीची बघ सुळसुळ;

मनाशीच घोळवत आवडीची गाणी
पहा तरी झाडे, पाने, आभाळ नि पाणी.

एक मात्र ऐक माझे- खडा नको फेकू
उमटली चित्रे नको पुसूनिया टाकू!

# मायकेलमामा

मायकेलमामा मायकेलमामा
कुत्रीला फिरवून आणलीस का?
मायकेलमामा मायकेलमामा
तुटलेली खुर्ची विणलीस का?

मायकेलमामा मायकेलमामा
पेपरवाल्याचा पत्ता काय?
पावाला लोणी कसं नाही आज?
आम्ही काय नुसती खायची साय?


मायकेलमामा मायकेलमामा
अंथरुणं अजून पडलीत तशी
बाळाच्या डोक्याशी चादर गेली
बाबांच्या पायाशी लोळते उशी!

मायकेलमामा मायकेलमामा
बेबीची रिबन शोधून दे
मायकेलमामा मायकेलमामा
बुटाची लेस जरा बांधून दे.

मायकेलमामा मायकेलमामा
अरे ....तू बोलत नाहीस कसा?
डोळे किती लाल लाल झालेत
बसलाय की रे तुझा घसा!

मायकेलमामा मायकेलमामा
राहू दे बघू सगळं काम
आल्याचा चहा करून देते
कपाळाला तुझ्या चोळते बाम!

मायकेलमामा मायकेलमामा
तुझ्यामागं आमची सदाचीच घाई
'मामा काय कामाचा?' थट्टेत सुद्धा
पुन्हा कधी मी म्हणणार नाही!




# दिवाळीचा फराळ

वरवंट्यानं कुटला
पोळपाटावर लाटला
खसखशीत घोळला
तुपातही तळला
याचे कौतुक केले भारी
तरी कोरडीच राहिली स्वारी— अनरसा

अठरा धान्ये आणली दळून
भिजवले पीठ, घेतले मळून
गोल गोल वळे हाताने वळले
झणझणीत तापल्या तेलात तळले
ताजे लोणी लावून पहा
खमंग चव- मटकवाल दहा !— कडबोळे

पदराआड पदर सात
साखरपेरणी वरती छान
नाजुक साजुक रंग रूप
साऱ्यांच्या आधी याचा मान
पांढऱ्या शुभ्र रेशमी घड्या
तबकात रचून रुमालाने झाका
हलक्या हाती उचलून हळूच
अलवार तुकडा तोंडात टाका— चिरोटा




गोल गरगरीत श्रीमंत पाहुणा
कुणाचा नवरा? कुणाचा मेहुणा?
साखरेचा स्वभाव, मऊ नरम अंग,
पिवळा धमक रसरशीत रंग
चांदीच्या ताटात रूप याचे खुलते
प्रत्येक घासाला स्वारी गोड बोलते!— लाडू

समोर ठेवून मोठी थोरली परात
काकू बसल्या होत्या सैपाक घरात
काकू होत्या काही तरी तळत
तेलात कुणी घाई घाई पळत
पिवळ्या काड्या गोल गोल फेरा
चमकत होत्या सोन्याच्या तारा
हळूच चिमणीने उचलून नेले
पिलांसाठी घरटे केले!— शेव



गोल गोल चकरा मारत बसते
तापल्या तेलात खुदू खुदू हसते
काटेरी स्वभाव, बोलणे तिखट
खमंग चव नाही बरं फुकट!
पदार्थ शंभर मिळमिळीत गोड
फराळाला हवीच माझी जोड!— चकली


थोडे पोहे, थोडे चुरमुरे,
थोडे शेंगदाणे, थोडे खोबरे,
थोडे डाळे, काजू थोडे,
शेवेचेही तुकडे थोडे,
चवीसाठी मनुका पहा
एकत्र केल्या जिनसा दहा.
वर फोडणी ओतली खमंग
चढला सुंदर पिवळा रंग
तोंडात टाका एकच घास
खूष होऊन जाल खास!— चिवडा




गोरीपान देखणी बाई
साखरखोबऱ्याचे सारण खाई
पांढरेशुभ्र पातळ नेसते
तुपात नाहून ताटात बसते
अंगाने जरी लठ्ठ खूप
चंद्राची कोर तसे रूप— करंजी

दूध तूप साखर एक केली फेसून
मैदा आणि रवा त्यात बसले घुसून
घट्ट मळले पीठ वरवंट्याने कुटले
पोळपाटावर ताईने छोटे गोळे लाटले
तुपात काढले तळून इवले इवले काप
फुगून कसे टम्म झाले आपोआप.
खुसखुशीत खमंग चव भारी छान
चहाच्या बैठकीत यांचा पहिला मान.— शंकरपाळी

## मुंग्यांच्या जगात



एका मुंगीच्या पोराला सापडला गहू
'येवढे थोरले ओझे' म्हणे 'घरी कसे नेऊ?
मग त्याने केला खूप खूप जोर
गव्हाला बांधला लांबलचक दोर
खेचत चालला घेऊन, गाणे लागला गाऊ!



हत्तीच्या पायावर मुंगीने दिला पाय
हत्ती बोलला चिडून, 'डोळे फुटले काय?'
मुंगीने पाहिले मागे, पुढे गेली हसून
हत्ती राहिला रडत जागच्या जागी बसून
पाय चोळत विचारा म्हणे, 'हाय हाय!'

(३)


मुंगीबाईच्या घरी मोठी चोरी झाली
चार कण साखर चोरांनी लुटून नेली
मुंगीच्या नवऱ्याने पोलिसांत दिली वर्दी
शेजाऱ्यापाजाऱ्यांनी येऊन केली गर्दी
गेलेली वस्तू पण पुन्हा नाही आली!



एका मुंगीच्या पोराने सिनेमा पाहिला ‘ शोले ’
तेव्हापासून साऱ्यांशी तो गुरकावून बोले
‘ अरे ओ सांभा ! ’ जोरात मारी हाक
गल्लीतल्या पोरांना उगाच दाखवी धाक
गब्बारसिंगासारखा डुलत डुलत चाले




(३)



एका मुंगीबाईने खरेदी केला टी.व्ही.
छायागीत, ज्ञानदीप- सारे प्रोग्राम लावी
‘ नको ’ म्हणे ‘ कुणाकडे उगीच आता जायला
उगीचच कुणाचे बोलून नको घ्यायला !
शेजारणीची मेलीची ऐट कशाला हवी ? ’

एका मुंगीचे पोर भलतेच होते लठ्ठ
भलतेच होते लठ्ठ आणि अभ्यासात मठ्ठ
मुलखाचे आळशी, कामाचे नाही नाव
पालथा घालून यायचे रोज उभा गाव
घरी येताच खाण्यासाठी धरून बसायचे हट्ट !




मुंग्यांच्या गावात पोलिस आला नवा
मागून घेऊन खाई- कधी रवा, कधी खवा,
याच्याकडून त्याच्याकडून सारखी लाच खाई
येवढे खाऊन सुद्धा त्याचे पोट भरले नाही
शेवटी त्याला खावी लागली तुरुंगाची हवा!

एक म्हातारी मुंगी देवदर्शनाला जाई
उपासाच्या निमित्ताने चमचमीत खाई
दररोज गावामध्ये मारायची चकरा
मारुतीला प्रदक्षिणा घालायची अकरा!
भजन करून साऱ्यांचे डोके उठवत राही!

शेजारच्या घरात आले नवे बिऱ्हाड
येवढे मोठे कुटुंब जसे लग्नाचेच वऱ्हाड!
एक मुंगा, एक मुंगी, मुंगूबाळे दहा
आजा, आजी, काका काकी, नोकरचाकर सहा
त्यांचे मूळ गाव त्याचे नाव म्हणे कऱ्हाड

एक मुंगा उद्योजक असामी होती बडी
ॲम्बॅसॅडर गाडी त्यांच्या दारापुढे खडी
त्यांची छोटी नात म्हणे, 'जुनी नको नवी
मला बाई छान छान 'मारुती'च हवी!'
येवढीशी पोर तिची केवढी मोठी उडी!

REFBK-0026082



एका मुंगीचे तान्हे बाळ होते काळे काळे
हातांपायांच्या तारा, ठिपक्यांसारखे डोळे
तरी सुद्धा मुंगीने थाटात केले बारसे
बाळाच्या कुंचीला लावले छान आरसे
शिवाय त्याच्या पायांत घातले सोन्याचे वाळे.

एक मुंगी नायलॉनची साडी नेसून सजली
फिरायला गेली पण पावसामध्ये भिजली
त्यामुळे ती आणखी छान लागली दिसू
लोक तिच्याकडे बघून लागले हसू
पदर सावरत मुंगी मग लाज लाज लाजली!

